cmyk

## संपादकीय

### पाठवणीच्या पद्धतीला ट्रम्प यांचा हेकेखोरपणा कारणीभूत

अमेरिकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर अवैध वास्तव्य करणाऱ्या नागरिकांविरोधात कडक पवित्रा घेतल्याचे दिसत आहे. ट्रम्प यांनी निवडणूक प्रचारातच अमेरिकेत बेकायदेशीरपणे राहणाऱ्या परदेशस्थ नागरिकांची संबंधितांच्या देशात परत पाठवणी करण्याचा इशारा दिला होता. त्यानुसार ट्रम्प यांनी यासंदर्भातील कारवाई सुरू केली असून, त्याचाच एक भाग म्हणून अमेरिकन हवाई दलाचे विमान अमृतसर येथील विमानतळावर उतरवण्यात आले.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com







बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२८७ | रविवार, दि.९ फेब्रुवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

# शेतकऱ्यांना आता वर्षाला मिळणार नऊ हजार





## भाजप दिलेले आश्वासन पूर्ण करणार

### ४० हजार शेतकऱ्यांना होणार फायदा

देशाची राजधानी दिल्लीतील खेड्यापाड्यात सुमारे ४० हजार शेतकरी राहतात. अहवालानुसार, दिल्लीतील पीएम किसान सन्मान निधीमध्ये नोंदणीकृत शेतकऱ्यांची संख्या एकूण एक चतुर्थांश आहे. जर आपण आकड्यांवर नजर टाकली तर दिल्लीत पीएम किसानशी संबंधित शेतकऱ्यांची संख्या सध्या १०८०० च्या आसपास आहे.

### पीएम किसान निधीचा हप्ता २४ फेब्रुवारीला

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी २४ फेब्रुवारीला बिहार दौऱ्यावर आहेत. तिथे पंतप्रधान किसान सन्मान निधीचा १९ वा हप्ता वितरीत केला जाणार आहे. दिल्लीतील शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्येकी ३००० रुपये जमा होण्याची शक्यता आहे. पीएम किसान अंतर्गत देशातील ११ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना पैसे हस्तांतरित केले जाऊ शकतात, ज्यांची रक्कम ३.५० लाख कोटी रुपये आहे.


नवी दिल्ली । वृत्तसंस्था

दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपला मोठे यश मिळालं आहे. आम आदमी पार्टीचा या निवडणुकीत मोठा पराभव झाला आहे. दरम्यान, भाजपच्या या विजयाचा मोठा फायदा दिल्लीतील शेतकऱ्यांना होणार आहे. कारण पंतप्रधान किसान सन्मान निधीशी संबंधित शेतकऱ्यांना आता प्रत्येकी तीन महिन्याला २००० रुपयांऐवजी ३००० रुपये मिळणार आहेत. म्हणजे संपूर्ण वर्षात शेतकऱ्यांना ९००० रुपये मिळणार आहेत.


देशाची राजधानी दिल्लीच्या विधानसभा निवडणुकीचे निकाल आता पूर्णपणे स्पष्ट झाले आहेत. तब्बल २७ वर्षांनंतर राज्यात भाजपचे सरकार स्थापन होत आहे. सरकार स्थापन झाल्यानंतर राजधानी दिल्लीतील जनता भाजपने आपल्या निवडणूक भाषणात आणि जाहीरनाम्यात दिलेल्या आश्वासनांवर लक्ष ठेवणार आहे. विशेषत: शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासने सरकार पूर्ण करणार का? याकडे सर्वांचं लक्ष लागले आहे. दिल्लीत भाजपचे सरकार आल्यास पीएम किसान योजनेंतर्गत नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना वर्षाला ६००० रुपयांऐवजी ९००० रुपये दिले जातील, असे आश्वासन भाजपने दिले होते. दर चार महिन्यांनी, देशातील शेतकऱ्यांना २,००० रुपये मिळतात, तिथे दिल्लीतील शेतकऱ्यांना मात्र ३,००० रुपये मिळतील. ◀◀ पान २ वर

## कारच्या भिषण अपघातात दोन डॉक्टर ठार

### दुसरे डॉक्टर नवदाम्पत्य गंभीर जखमी







बीड । प्रतिनिधी

लग्नानंतर देवदर्शनाला जावून परतणाऱ्या कुटूंबाच्या कारला अपघात होऊन दोन डॉक्टर ठार तर डॉक्टर नवदाम्पत्य गंभीर जखमी झाल्याची घटना शनिवारी रात्री अहिल्यानगर – अहमदपूर राष्ट्रीय महामार्गावरील मुळुकवाडी येथे घडली. अपघातग्रस्त कारचा अक्षरश: चुराडा झाला आहे.

डॉ. मृणाली भास्कर शिंदे व डॉ. ओमकार ज्ञानोबा चव्हाण अशी अपघातात ठार झालेल्यांची नावे आहेत. तर, डॉ. मंथन चव्हाण व डॉ. ऐश्वर्या चव्हाण हे नवदाम्पत्य गंभीर जखमी आहे. अपघातग्रस्त कुटूंब वझुर (ता. मानवत, जि. परभणी) येथील आहे. जखमींवर छ. संभाजीनगर येथील खासगी रुग्णालयात ◀◀ पान २ वर

# धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याच्या निर्णयाचा फुटबॉल इकडून तिडके!

## धाकटे पवार म्हणाले, फडणवीस साहेब काय ते तुम्हीच ठरवा







### फडणवीसांचे कानावर हात

अजित पवारांनी फडणवीसांच्या कोर्टात चेंडू टोलावल्यानंतर फडणवीसांनी या प्रकरणी कानावर हात ठेवले आहेत. अजित पवार काय बोललेत हे मी त्यांना विचारीन नंतरच त्यावर बोलेन असे फडणवीसांनी सांगितले. पण मुंडेंच्या राजीनाम्याबाबत त्यांनी कोणतेही उत्तर देणे टाळले आहे.

मुंबई । प्रतिनिधी

धनंजय मुंडेंबाबतचा निर्णय आता फडणवीसांच्या कोर्टात होणार असल्याचे संकेत उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दिले आहेत. गेल्या काही दिवसापासून धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याच्या निर्णयाचा फुटबॉल इकडून तिकडे ढकलला जात आहे. अगोदर अजितदादांनीच काय तो निर्णय घ्यावा, तो त्यांच्या पक्षाचा विषय असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगत हात वर केले होते. आता धाकट्या पवार साहेबांनी सुध्दा मुंडेंच्या राजीनाम्याच्या निर्णयाचा फुटबॉल मुख्यमंत्र्यांच्या कोर्टात टाकला आहे. तसेच आरोपांमध्ये तथ्य असेल तर मुख्यमंत्री चौकशीचे सुध्दा आदेश देतील, असेही ते म्हणाले.

संतोष देशमुख खून प्रकरण आणि पवन चक्की खंडणी प्रकरणानंतर धनंजय मुंडे यांच्यावर आरोपींना पाठीशी घालण्याचे आरोप होऊ लागले. त्याच्या राजीनाम्याची मागणी विरोधकांनी लावून धरली. याबाबत अजित पवार यांनी मोठा खुलासा केला आहे. अंजली दमानियांनी मुंडेंवर केलेल्या आरोपाची, पुराव्याची जी माहिती मला दिली तिच त्यांनी मुख्यमंत्र्यांना दिली असल्याचेही अजित पवार म्हणाले. त्यामुळे आता मुंडेंबाबत काय करायचे ते तुम्ही ठरवा असे अजित पवारांनी फडणवीसांना सांगितले आहे. इतकंच नाही तर आरोपांमध्ये तथ्य असेल तर चौकशी होईल, मुख्यमंत्री तसे आदेश देऊ शकतात असेही अजित पवारांनी म्हटले आहे. धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याच्या निर्णयाचा फुटबॉल झाल्याचे चित्र सध्या निर्माण झाले आहे. धनंजय मुंडे हे राष्ट्रवादीचे नेते आहेत त्यामुळे त्यांच्या राजीनाम्याचा निर्णय अजित पवार घेतील असे काही दिवसांपूर्वी देवेंद्र फडणवीस म्हणाले होते. त्यानंतर अंजली दमानियांनी कृषी विभागात कोट्यवधींचा घोटाळा केल्याचे आरोप केले. धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यासाठी चोहोबाजूंनी दबाव आलेला असताना अजित पवारांनी आता पुन्हा वेगळी भूमिका घेतली. मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस ◀◀ पान २ वर

## परळीत होणार पशुवैद्यकीय महाविद्यालय

### पंकजा मुंडे यांचे पशुसंवर्धन खात्याला आदेश



बीड । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी परळीत शासकीय पशू वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याचे आदेश पशुसंवर्धन विभागाला दिले आहेत. महाविद्यालयांसाठी लागणाऱ्या जागेची पाहणी करण्यासाठी पशू विज्ञान विद्यापीठाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची टीम रविवारी परळीत दाखल होत आहे, लवकरच या कामाला गती येणार आहे.

राज्यात परळी वैजनाथ आणि बारामती या दोन ठिकाणी नवीन शासकीय पशू वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याची घोषणा ना. पंकजाताई मुंडे व उप मुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत बारामती येथे नुकत्याच झालेल्या एका कार्यक्रमात करण्यात आली होती. त्या अनुषंगाने या दोन्ही ठिकाणी महाविद्यालय स्थापन करण्याकरिता ◀◀ पान २ वर

### ना. पंकजाताईंनी घेतला आढावा

शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात ना. पंकजाताई मुंडे यांनी पर्यावरण सोबतच परळीत होणाऱ्या नवीन शासकीय पशू वैद्यकीय महाविद्यालयाच्या जागेचा आढावा घेतला होता. अधिकाऱ्यांच्या टीम कडून जागेचा निर्णय घेतला येणार आहे, त्यानुसार ते अधिकारी रविवारी जागेची पाहणी करणार आहेत.

## भाजपाचा दिल्लीत विजय !

# अरविंद केजरीवाल, मनोज सिसोदिया पराभूत

### भाजपाला सर्वाधिक ४८ जागा, आम आदमी पार्टीला २१ तर काँग्रेस पराभूत



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

दिल्ली विधानसभा निवडणूकीसाठी ५ फेब्रुवारीला मतदान पार पडल्यानंतर शनिवारी ८ फेब्रुवारीला मतमोजणीला सकाळपासून सुरुवात झाली. सकाळपासूनच सर्व्हेक्षण कंपन्यांनी अंदाज वर्तविल्याप्रमाणे भाजपा ४० हून अधिक विधानसभा मतदारसंघात आघाडीवर होती. तर दुपारनंतर भाजपने बहुमताकडे वाटचाल सुरु केल्याचे चित्र स्पष्ट झाले. दिवस अखेर भाजपाला ४८ जागांवर विजय मिळाला. या निमित्ताने दिल्लीतील विधानसभा निवडणूकीत तब्बल २६ वर्षानंतर भाजपाने एकहाती विजय मिळवित आपले सरकार स्थापन करण्याचा मार्ग मोकळा केला आहे. विशेष म्हणजे दिल्ली विधानसभा निवडणूकीत आम आदमी पार्टीचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल ◀◀ पान २ वर

### अतिशी होणार विरोधी पक्षनेत्या

दिल्ली विधानसभेच्या विरोधी पक्षनेतेपदी विद्यमान मुख्यमंत्री अतिशी यांची निवड होण्याची शक्यता आहे. विधानसभा निवडणुकांचे जवळजवळ संपूर्ण कल हाती आले आहेत. भाजपने स्पष्ट बहुमतासह मोठा विजय मिळवला. त्यामुळे आता मुख्यमंत्री अतिशी यांच्याकडे विरोधी पक्षनेते ही जबाबदारी दिली जाण्याची शक्यता आहे. आम आदमी पक्षाचे प्रमुख नेते असलेले अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया, सौरभ भारद्वाज असे प्रमुख नेते विधानसभा निवडणुकीत पराभूत झाले. त्यामुळे विरोधी पक्षांच्या वाट्याला येणारी विरोधी पक्षनेते ही प्रमुख जबाबदारी अतिशी यांच्या खांद्यावर दिली जाऊ शकते. त्या संदर्भात एक बैठकही अरविंद केजरीवाल यांच्या निवासस्थानी दुपारी पार पडली.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०८ फेब्रुवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू: ८.०० क्विंटल | | |
| ३,२९० | ३,२९० | ३,२९० |
| ज्वारी/हायब्रिड: २१.०० क्विंटल | | |
| २,१०० | २,४०० | २,२३६ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | | |
| २,२०१ | २,२०१ | २,२०१ |
| तूर : १७५.०० क्विंटल | | |
| ६,५९० | ७,१८६ | ७,०१३ |
| उडीद : ६.०० क्विंटल | | |
| ५,००० | ६,३०० | ५,६५० |
| बाजरी: ४.०० क्विंटल | | |
| २,९८० | २,९८० | २,९८० |
| मुग : ०.५० क्विंटल | | |
| ७,२५० | ७,२५० | ७,२५० |
| सोयाबीन: २४३.५० क्विंटल | | |
| ३,८०१ | ४,०६० | ४,००८ |
| हरभरा: १०.०० क्विंटल | | |
| ५,४७० | ५,५०० | ५,४८५ |

## तीन भावांनी राज्यातील लाखो बहिणींशी केली गद्दारी–नाना पटोले



मुंबई । प्रतिनिधी

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून सत्तेत आलेल्या महायुतीने राज्यातील लाखो माता भगिनींची घोर फसवणूक केली आहे. मतांसाठी सरसकट सर्व बहिणींना १५०० रुपये देऊन त्यांची मते घेतली व सत्तेवर आल्यानंतर मात्र या बहिणींना दिलेल्या मदतीला कात्री लावण्याचे पाप केले जात आहे, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

विभानसभा निवडणुकीपूर्वी राज्य सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरु केली होती. ◀◀ पान २ वर

## कॉपी करणे आता अजामीनपात्र गुन्हा

मुंबई । प्रतिनिधी

दहावी आणि बारावीच्या परीक्षेत गैरप्रकार (कॉपी) करताना सापडल्यास त्यावर थेट दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल होणार आहे. यामध्ये अशा गैरप्रकाराना उद्युक्त करणारे, मदत करणाऱ्यावरही थेट कारवाई केली जाईल, असा इशारा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी आणि बारावीच्या परीक्षांना सामोऱ्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांना दिला आहे. बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारीपासून सुरू होत आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या दहावी–बारावीच्या परीक्षेत यंदा १४ लाख ◀◀ पान २ वर

# क्रीडा महोत्सवातून उत्कृष्ट खेळाडू घडतील–आ.विजयसिंह पंडित

## दिमाखदार सोहळ्यात खेळाडूंना पारितोषिकांचे वितरण



गेवराई । प्रतिनिधी

पारदर्शक आणि तंत्रशुद्ध पद्धतीने घेतलेल्या जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या क्रीडामहोत्सवातून उत्कृष्ट खेळाडू तयार होतील. पुढील काळात या क्रीडा महोत्सवाला व्यापक स्वरूप देण्यासाठी तालुक्यातील इतर शाळांच्या विद्यार्थ्यांनाही सहभागी करून घेतले जावे. कोणत्याही क्षेत्रात ध्येय गाठायचे असेल तर सराव आणि सातत्य महत्वाचे आहे. वर्षभर खेळाचा सराव आणि स्पर्धेमध्ये सातत्य ठेवल्यामुळे गेवराई तालुक्याच्या ग्रामीण भागामधील खेळाडू या महोत्सवात घडत आहेत ही अतिशय अभिमानाची गोष्ट आहे. ◀◀ पान २ वर

### क्रीडा क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण व्हावी –रणवीर पंडित

आपल्या प्रास्ताविक भाषणात बोलताना क्रीडा महोत्सवाचे आयोजक रणवीर पंडित म्हणाले की, ग्रामीण भागातील आपल्या मातीतील खेळाडू घडावेत आणि पुढे जावेत, हे माझे स्वप्न आहे. आपल्या भागातील विद्यार्थी उद्या देशाचे नेतृत्व करतील याचा मला विश्वास आहे. क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून गेवराई तालुक्याच्या ग्रामीण भागातील विद्यार्थी खेळाडूंनी आपली चमक दाखवली. प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थी खेळाडूंची मेहनत यामुळे हा क्रीडा महोत्सव यशस्वी झाला आहे. यापुढील काळातही व्यापक पद्धतीने क्रीडा महोत्सव घेवून क्रीडा क्षेत्रात गेवराई तालुक्याची वेगळी ओळख निर्माण होईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### शिवछत्र परिवाराने क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय काम केले –नवीद मशायक

शिवछत्र परिवाराने गेल्या अनेक वर्षा पासून क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय काम केले असून मला सुद्धा यातूनच फुटबॉल क्षेत्रामध्ये नाव कमावता आले. रणवीर पंडित यांची तळमळ ही आपल्या भागातील विद्यार्थ्यांना घडवायची आहे. क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून त्यांनी गेवराई तालुक्यात खेळाचे वातावरण तयार केले आहे. त्यामुळेच शिवशारदा पब्लिक स्कूल आणि शारदा क्रीडा अॅकडमच्या फुटबॉल खेळाडूंची महाराष्ट्रात वेगळी ओळख निर्माण झाली ही अभिमानाची गोष्ट आहे. आपण दोन घंटे जिद्दीने आणि तळमळीने या खेळासाठी दिले तर या भागातील विद्यार्थी यशाचे शिखर गाठेल असे प्रतिपादन फुटबॉलचे राष्ट्रीय खेळाडू तथा प्रशिक्षक नवीद मशायक यांनी केले.

### ग्रामीण भागातील खेळाडूंना ऊर्जा देणारा हा क्रीडा महोत्सव आहे –कालिदास नवले

खेळाची मोठी परंपरा शिवाजीराव दादा पंडित परिवाराला आहे. तोच वसा आणि वारसा घेऊन रणवीर पंडित यांनी सर्व सामन्यांची लेकरं देश पातळीवर क्रीडा क्षेत्रात चमकावीत हे स्वप्न पहिले. आणि ते साध्य करण्यासाठी धडपड करत आहेत. खेळाडूना ऊर्जा मिळावी म्हणून हा क्रीडा महोत्सव होत असून ग्रामीण भागातील लेकरांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारण्याचे काम शिवछत्र परिवार करत आहे असे गौरवोद्गार सरपंच संघटनेचे अध्यक्ष कालिदास नवले यांनी काढले.

cmyk

अग्रलेख

# पाठवणीच्या पद्धतीला ट्रम्प यांचा हेकेखोरपणा कारणीभूत

अमेरिकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर अवैध वास्तव्य करणाऱ्या नागरिकांविरोधात कडक पवित्रा घेतल्याचे दिसत आहे. ट्रम्प यांनी निवडणूक प्रचारातच अमेरिकेत बेकायदेशीरपणे राहणाऱ्या परदेशस्थ नागरिकांची संबंधितांच्या देशात परत पाठवणी करण्याचा इशारा दिला होता. त्यानुसार ट्रम्प यांनी यासंदर्भातील कारवाई सुरू केली असून, त्याचाच एक भाग म्हणून अमेरिकन हवाई दलाचे विमान अमृतसर येथील विमानतळावर उतरवण्यात आले. या विमानात १०४ जणांचा समावेश असल्याचे सांगण्यात आले. संबंधित नागरिक हे प्रामुख्याने पंजाबमधील असून, पोलिसांच्या वाहनांतून त्यांची आपापल्या घरी पाठवणी करण्यात आली आहे. तर हरियाणा, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात आणि चंदीगडमधील लोकांचे परतणे अद्याप बाकी असल्याचे बोलले जात आहे.

हे बघता पुढच्या टप्प्यात आणखी काही स्थलांतरीतांना भारतात आणले जाण्याची चिन्हे दिसतात. बेकायदा वास्तव्य हा जगभरातील सर्वच देशांपुढचा आज आणीबाणीचा प्रश्न बनला आहे. भारतासारख्या देशालाही मागच्या काही वर्षांत या प्रश्नाची मोठ्या प्रमाणात झळ बसली आहे. बांग्लादेशी घुसखोरांचे भारतातील प्रमाण लक्षणीय असून, हा प्रश्न देशाकरिताही डोकेदुखी होऊन बसला आहे. भारतासारख्या प्रचंड लोकसंख्येच्या देशात तशा समस्या कमी नाहीत. घुसखोरांमुळे गुन्हेगारीसह रोजगार, पायाभूत सुविधांवरील ताण अधिकच वाढत असल्याचे बघायला मिळते. या पार्श्वभूमीवर अमेरिकेमध्ये अवैधरीत्या भारतीय राहत असतील, तर तेही गैरच ठरावे. तसा भारतीय समाज हा शांतताप्रिय आणि कष्टाळू आहे. भारतीयांमध्ये गुणवत्ताही ठासून भरली असून, कोणत्याही परिस्थितीत टिकून राहण्याची निसर्गदत्त चिकाटी त्यांना लाभली आहे. स्वाभाविकच जगाच्या पाठीवरील अनेक देशांमध्ये भारतीय लोक विपुल संख्येने विखुरलेले पहायला मिळतात. असे असले, तरी वास्तव्यासंदर्भात काही नियम आहेत आणि प्रत्येकाने ते पाळायला हवेत, याबाबत दुमत असण्याचे कारण नाही. स्थानिक आणि बाहेरचे हा संघर्ष अलीकडे सर्वत्रच वाढताना दिसतो. केवळ देशादेशांमध्ये नव्हे, तर दोन प्रांतांमध्ये हा संघर्ष झडल्याची उदाहरणे पहायला मिळतात. अमेरिकन लोकांमध्येही भारतीय वा तत्सम नागरिक आपला रोजगार हिरावत असल्याची भावना आहे. ट्रम्प यांच्यासारख्या उजव्या विचारसरणीच्या नेत्याने अमेरिका फर्स्ट हा नारा देत एकप्रकारे या देशातील असंतुष्ट नागरिकांच्या भावना कुरवाळण्याचा प्रयत्न केला आहे. मुळात ट्रम्प यांची कोणताही निर्णय घेण्याची वा कामाची पद्धती ही अतिशय आडदांड आणि धसमुसळी आहे. स्थलांतरीतांच्या प्रश्नावरही त्यांनी असाच धसमुसळेपणा केल्याचे दिसते. जगातील वेगवेगळ्या देशांशी संवाद साधून, सामंजस्याने चर्चा करून ट्रम्प यांना हा प्रश्न सोडविता येऊ शकतो. मात्र, त्याऐवजी ट्रम्प एकदम घाईगडबडीत अमेरिकन विमानातून भारतीय अथवा अन्य देशियांना त्यांच्या देशात पाठवून देतात, हे काही बरोबर म्हणता येणार नाही. हे बघता भारतीय स्थलांतरितांना अमेरिकेतून अवमानकारक पद्धतीने आणले जात असल्याचा आरोप विरोधी पक्षाने करणे, स्वाभाविकच ठरते. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी नागरिक पाठवणीची प्रक्रिया जुनीच असून, भारत सरकारला याची पूर्ण माहिती होती, असे निवेदन राज्यसभेत केले खरे. पण ही प्रक्रिया जुनीच असली, तरी ती राबविण्याची पद्धत ट्रम्प यांच्या कारकिर्दीत बदलली तर नाही ना, असा प्रश्न उपस्थित करण्यात येतो. भारतात परत पाठविल्या जाणाऱ्या नागरिकांसोबत गैरवर्तन होऊ नये, म्हणून अमेरिकन सरकारशी भारत सतत संवाद साधत आहे, असे अमेरिकेच्या इमिग्रेशन आणि एन्फोर्समेंट विभागाने स्पष्ट केले आहे. असे असले, तरी परत पाठवणी झालेल्या काही नागरिकांनी व्यक्त केलेली नाराजी दुर्लक्षिता येणारी नाही. हात आणि पाय बांधून या नागरिकांची रवानगी करण्यात आल्याचाही आरोप करण्यात येत आहे. या माध्यमातून ट्रम्प यांना जगातील स्थलांतरितांना कठोर संदेश द्यायचा असल्याचेही बोलले जाते. तथापि, २०१२ पासून लागू झालेल्या प्रक्रियेनुसार विमानात अवैध नागरिकांना बांधून पाठवले जाते. मात्र, महिला आणि मुलांना परत पाठवताना त्यांचे हात बांधले जात नाहीत, असेही अमेरिकेने स्पष्ट केले आहे.

अवैध राहणाऱ्यांविरोधात कारवाई करण्याचा अमेरिकेसारख्या देशाला नक्कीच अधिकार आहे. त्यांनी त्यांच्या कायद्यानुसार कारवाई करणेही अपेक्षितच होय. मात्र, परत पाठवणी करताना संबंधित नागरिकांचा सन्मान राखणेही आवश्यक होय. मुख्य म्हणजे या पातळीवर दोन्ही देशांमध्ये योग्य संवाद असेल, तर या मुद्द्यावर कोणतेही मतभेद वा मनभेद होण्याची शक्यता निर्माण होणार नाही. काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि डोनाल्ड ट्रम्प हे चांगले मित्र असल्याकडे लक्ष वेधत भारताने आपल्या नागरिकांसाठी विमान का पाठवले नाही, असा सवाल केला आहे. हे बघता असे विमान आपल्याला पाठवता आले असते का, हेही तपासले पाहिजे. खरे तर भारताच्या या प्रश्नावरील कन्सेप्ट अतिशय स्पष्ट आहेत. विदेशात अवैध राहणाऱ्या नागरिकांना स्वीकारणे ही प्रत्येक देशाची जबाबदारी आहे, असे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर म्हणतात, त्यातच सर्व आले. याचा विचार करता अमेरिकेनेही विवेकाने आणि संयमाने हा मुद्दा हाताळणे योग्य ठरेल. विषय पनामा कालव्याचा, गाझा पट्टीचा असो किंवा अतिरिक्त टॅक्स, स्थलांतरितांच्या प्रश्नाचा असो. ट्रम्प हे हेकेखोर पद्धतीने व एककल्लीपणे या सगळ्यावर भूमिका घेताना दिसतात. वास्तविक या सगळ्या प्रश्नांवर चर्चेतून मार्ग निघू शकतो. परंतु, ट्रम्प यांना हुकूमशाही पद्धतच पसंत असल्याचे दिसते. हे बघता त्यांच्या काळात जगाचा पोत बिघडण्याबरोबरच जागतिक अर्थकारणामध्येही अडथळे येण्याची भीती संभवते. याचा विचार करता सर्वच देशांनी यातून योग्य तो 'पाठ' घेतला पाहिजे.

## व्यापाऱ्यांनी डिजिटल ॲपवर नोंदणी करावी–हस्तीमल बंब

**जालना । प्रतिनिधी**

जनरल मर्चन्टस् असोसिएशनच्या पदाधिकार्यांचे जिल्ह्यातील सर्व तालुके व ग्रामीण भागात संपर्क दौरा अति उत्साहात नुकतेच पार पडले. त्यावेळी गांव सभेत जिल्हाध्यक्ष हस्तीमलजी बंब मार्गदर्शन करताना जिल्ह्यातील व्यापार्यांनी डिजिटल ॲप वर नोंदणी करावे असे आव्हान केले. आधुनिक तंत्रज्ञान टॅक्नॉलाजीच्या माध्यमाने डिजिटल आरबीट ॲप तैयार करण्यात आले आहे.प्रत्येक व्यापार्यांनी क्लिक करून आपल्या स्वतःचा प्रतिष्ठाण व व्यवसायाची संपूर्ण माहिती पासपोर्ट फोटो सह टाकावे. सर्व व्यापार्याची डिजिटल डिरेक्टरी तैयार करण्यात येईल. त्या माध्यमाने देश – विदेशातील उद्योग–व्यवसायाची तसेच जिल्हा, विभागीय, राज्य व राष्ट्रीय पातळीवर व्यापारी संघटनेच्या योजनेची/कार्याची माहिती घर बसल्या आपल्या मोबाईल वर मिळेल. मोठे–मोठे मॉल, ऑनलाईन व्यवसाय इ. मुळे लहान–सहान व्यवसाय करणारे लोक संकटात सापडले आहे. व्यापार्यांना सुध्दा आपल्या व्यवसायात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व सद्पयोग करून पुढे जावे लागणार आहे. डिजिटल ॲपच्या माध्यमाने नव्याने सदस्यता अभियान, जनगणनाचा उद्दिष्ठ आहे असे बंब म्हणाले. या संपर्क दौर्यात श्री बंब सोबत माजी अध्यक्ष शिवाजी तनपुरे, उपाध्यक्ष मोहम्मद कासीम बावला, सचिव संदीप काबरा, लोकमत मिडियाचे माजी जनरल मॅनेजर डिजिटल आरबीट ॲपचे सुत्रधार मकरंद शहापुरकर, टाईम डायरीचे सुभाष सोनुने इ. सहभागी होते. सर्व तालुका व गांव शाखेचे अध्यक्ष, पदाधिकारी, कार्यकारिणीच्या पुर्नःगठण, निवड करून नियुक्ती पत्र देण्यात आले. त्यात अंबड तालुका अध्यक्षपदी विशाल लाहोटी, बदनापुरचे पंकज तापडिया, दाभाडी शाखेचे अमोल देहाडराय, भोकरदन तालुका अध्यक्ष पदी ज्ञानेश्वर नवल, घनसावंगी तुलाका सुदर्शन पाटील, कुंभार पिंपळगांवचे संतोष गबाळे, जाफ्राबाद तालुक्याचे प्रल्हाद लोखंडे, मंठा तालुक्याचे सर्जेराव बोराडे, परतुर तालुक्याचे धीरज भंडारी व आष्टीचे अरुण डोहेळकर यांची अध्यक्ष पदी निवड करण्यात आली. डिजिटल आरबीट ॲप सदस्य नोंदणी व अधिक माहितीसाठी मो. नंबर ८८३०१९८२६० यांच्याशी संपर्क साधावा व लवकरात लवकर जिल्ह्यातील सर्व लहान मोठे व्यवसाय करणारे व्यापार्यांनी डिजिटल ॲप वर नोंदणी करावे, असे आव्हान जिल्हाध्यक्ष हस्तीमल बंब यांनी केले आहे.

## स्वतःच्या १३ वर्षीय मुलीवर अत्याचार करणाऱ्यां नराधम बापाला अटक

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील चंदनझिरा पोलीस ठाणे हद्दीतील नविन मोंढा भागातील हनुमान नगर येथे राहणारा अनिल तुकाराम घाडगे वय ४० वर्ष याने स्वतःच्या अल्पवयीन मुलीला त्याचे मोबाईल फोन मधुन अश्लिल व्हीडोओ दाखवून तिच्यासोबत जबरदस्तीने तिच्यावर लैंगीक अत्याचार केला व तिने आईला सांगते असे म्हणाली असता तिला गळा दाबुन जिवे मारण्याची धमकी देऊन असा नराधमा विरुध्द पिडीत बालीकेने तिच्या आई सोबत पोलीस स्टेशनला जाऊन तक्रार दिल्यावरुन पोलीस



ठाणे चंदनझिरा येथे भारतीय न्यायसंहिता व पोक्सों अंतर्गत वेग वेगळ्या कलमान्वये गुन्हा दाखल केला . सदरील घटना गंभीर असल्याने पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी पोलिसाला आदेश देऊन तत्काळ नराधम बापास अटक करावे अशी सूचना केली होती . त्या अनुषंगाने चंदनझिरा पोलीसांनी तात्काळ जालना शहरात शोध घेवून सदर बाजार पोलीसांच्या मदतीने नराधम बापाला पकडून अटक करण्यात आली सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. अजयकुमार बन्सल मा. अपर पोलीस अधिक्षक ,उप विभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांचे मागदर्शनाखाली प्रो.डि.वाय.एस.पी. करिश्मा चोधरी मॅडम, व सदर बाजार पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदीप भारती महिला सपोनि गायकवाड मपोओं भागवत व पोस्टे चंदनझिरा जालना चे पोलीस उप निरीक्षक विठ्ठल शिंदे, अफसर हुशेन, अशोक जाधव कृष्णा तंगे, साई पवार, अभिजीत वायकोस, नवनाथ पाटील, चालक बोटवे यांनी सदरची कारवाई केली आहे.

## सहकारातील अडचणींवर चिंतन गरजेचे; रांगा लावून ठेवी मागने चुकीचे–ॲड. अजित देशमुख

**माजलगाव । प्रतिनिधी**

**सहकार चळवळ ही मानव विकासासाठी एकमेकांना सहकार्य करणारी चळवळ आहे. सुमारे दीडशे वर्षांपूर्वी सहकाराचा उगम झाला. यानंतर अनेक सहकारी संस्था आल्या. थेट ग्रामीण भागापर्यंत फक्त सहकाराची चळवळ रुजली. शेतकऱ्यांना दारात जाऊन कर्ज देणाऱ्या संस्था म्हणून सहकारी संस्थांकडे पाहिले गेले. मात्र आता सहकारातील अडचणींवर चिंतन होण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे सहकारी संस्थांनी देखील एकत्र येऊन चिंतन करण्याची गरज निर्माण झाल्याचे ज्येष्ठ समाज सेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित देशमुख यांनी म्हटले.**

माजलगाव येथील एका कार्यक्रमात कार्यकर्त्यांसमोर सहकारी चळवळीवर बोलताना ॲड. देशमुख पुढे म्हणाले की, खऱ्या अर्थाने सहकारी संस्था या ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेच्या कणा समजल्या जातात. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन कर्ज वितरण करणाऱ्या संस्था म्हणून विशेष कार्यकारी सहकारी संस्थांना संबोधले जाते. त्याचप्रमाणे



सर्व प्रकारच्या सहकारी पतसंस्था या शेतकऱ्यांसाठी वरदान ठरलेल्या आहेत. आता अनेक ठिकाणी थोडी चर्चा झाली की, संस्थांच्या पुढे ठेवीदारांच्या रांगा लागतात. काही ठिकाणी संस्थांचे चुकत असेल. मात्र अनेक चांगल्या संस्थांना देखील अडचणीत आणण्याचा प्रयत्न काही ठिकाणी जाणीवपूर्वक होत असल्याचे दिसते. कोणतीच संस्था अथवा थेट राष्ट्रीयकृत बँक देखील सर्वच ठेवीदार पैसे मागण्यासाठी एकत्र आले, तर पैसे देऊ शकत नाही, हे वास्तव आहे. याकडे देखील पाहिले पाहिजे. विना सहकार नही उद्धार, यासारखे ब्रीद वाक्य घेऊन साखर कारखाने, सूतगिरण्या, सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, बहुराज्यिय पतसंस्था, त्याचप्रमाणे अनेक प्रकारच्या सहकारी संस्था अस्तित्वात आल्या. लोकशाही पद्धतीने कारभार करणाऱ्या आणि सभासदांची मालकी असणाऱ्या या संस्थांमध्ये सातत्याने कायदेशीर बंधने वाढविण्यात आली. यात जनतेचे योगदान देखील मोठे आहे, असेही ते म्हणाले. राष्ट्रीयकृत बँका ज्या ठिकाणी मदत करत नाहीत, नियमाचा बडगा दाखवतात, त्या ठिकाणी सहकारी संस्थांनी अनेकांना उभे केले आहे. त्याचप्रमाणे सहकारी साखर कारखान्यांचे काम देखील शेतकरी पोषक ठरलेले आहे. सध्या राज्यात सहकारावर अनेक कार्यक्रम होत आहेत. सहकार दिंडी देखील महाराष्ट्रभर फिरत आहे. त्याचाच एक भाग म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## पान १वरून...

### दिल्लीतील शेतकऱ्यांना आता

दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान भाजपने अनेक घोषणा केल्या होत्या. त्या घोषणांपैकी एक घोषणा दिल्लीतील शेतकऱ्यांसाठीही होती. दरम्यान, पीएम किसान योजनेअंतर्गत प्रत्येक शेतकऱ्याला ९००० रुपये द्यावे लागले तर दिल्ली सरकारला या योजनेसाठी कोट्यावधी रुपयांचे बजेट वेगळे ठेवावे लागेल. आकडेवारीनुसार, दरवर्षी १०,८०० हून अधिक शेतकऱ्यांना ९,००० रुपये देणे म्हणजे त्यासाठीचे बजेट ९.७५ कोटी रुपये लागणार आहे.

------------

### धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याच्या

हेच मुंडेंच्या राजीनाम्याचा निर्णय घेतील असे सांगत दादांनी फडणवीसांकडे राजीनाम्याच्या निर्णयाचा फुटबॉल टोलावला आहे. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरेंनी मात्र वेगळी भूमिका घेतली. धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याचा फैसला अजित पवारच करतील असे सुनील तटकरे म्हणाले. धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यासाठी महायुतीतून दबाव वाढत आहे. विरोधकही तीच मागणी करत आहेत. अंजली दमानिया तर राजीनाम्यास कारण म्हणून रोज एक प्रकरण बाहेर काढत आहेत. अशावेळी राजीनाम्याचा निर्णय घेण्याऐवजी तो विषय टाळण्याकडंच महायुतीच्या नेत्यांचा कल दिसू लागला आहे.

------------

### कारच्या भिषण अपघातात

उपचार सुरु आहेत. डॉ. मंथन चव्हाण व डॉ. ऐश्वर्या चव्हाण यांचा चार फेबुवारीला विवाह झाला होता. त्यानंतर या दोघांसह डॉ. ओमकार चव्हाण व त्यांची चुलत बहिण डॉ. मृणाली शिंदे असे चौघेजण कारने देवदर्शनासाठी तुळजापूर, पंढरपूर व जेजूरीला गेले. जेजुरी येथून देवदर्शन उरकून हे कुटूंब कारने (क्रमांक एमएच २२ एएम ४५७१) अहिल्यानगर – अहमदपूर राष्ट्रीय महामार्गाने वझूर (ता. मानवत) गावाकडे परतत होते. पाटोदा ते मांजरसुंबानजीक मुळूकवाडीजवळ त्यांची कार एका पुलाच्या कठड्याला धडकली. यात कारच्या पुढच्या भागाचा पुर्ण चुराडा झाला. यात डॉ. मृणाली शिंदे व डॉ. ओमकार चव्हाण ठार झाले. तर, डॉ. ऐश्वर्या व डॉ. मंथन हे दाम्पत्य गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर संभाजीनगर येथे उपचार सुरु आहेत.

-------------

### भाजपाचा दिल्लीत विजय !

आणि उपमुख्यमंत्री तथा नेते मनीष सिसोदीया या दोन्ही दिग्गज नेत्यांना थोड्या मतांनी पराभवाचा सामना करावा लागला. दिल्ली विधानसभा निवडणूकीत आम आदमी पार्टीने प्रयत्नांची पराकाष्ठा करत दिल्लीचा गड कायम राखण्याचा प्रयत्न केला. या निवडणूकीत आम आदमी पार्टीला २२ जागांवर विजय मिळवता आला. दरम्यान, भाजपाकडून आचारसंहितेचे उल्लंघन करत मतदारांना वेगवेगळ्या गोष्टींची आमिषे दाखविण्यात येत असल्याची तक्रार, तसेच भाजपा नेत्यांच्या आणि मंत्र्यांच्या घरून अचानक करण्यात आलेली वाढीव मतदारांची नोंदणी संदर्भात केंद्रीय निवडणूक आयोग आणि दिल्ली निवडणूक आयोगाकडे तक्रारी दाखल केल्या. पण केंद्रीय निवडणूक आयोग आणि दिल्लीच्या निवडणूक आयोगाला या आरोपातील पुरावे आतापर्यंत तरी सापडले नाहीत. अरविंद केजरीवाल नवी दिल्लीतून पराभूत झाले, तर मनीष सिसोदिया जंगपुरामधून, सौरभ भारद्वाज ग्रेटर कैलाशमधून, सोमनाथ भारती हे मालवीय नगरमधून आणि दुर्गेश पाठक राजिंदर नगरमधून पराभूत झाले. भाजपाच्या परवेश वर्मा यांनी अरविंद केजरीवाल यांचा पराभव केला. दोन वेळा खासदार राहिलेले वर्मा २०१३ मध्ये मेहरौलीची जागा जिंकल्यानंतर थोड्या कालावधीपुरते आमदार होते, ते दिल्लीचे माजी मुख्यमंत्री, भाजपाचे दिवंगत साहिब सिंग वर्मा यांचे पुत्र आहेत. जंगपुरा येथे माजी उपमुख्यमंत्री सिसोदिया यांचा भाजपाच्या तरविंदर सिंग मारवाह यांनी अवघ्या ६७५ मतांनी पराभव केला. येथील काँग्रेसचे उमेदवार फरहाद सुरी यांना ७,३५० मते मिळाली. पटपडगंजचे तीन वेळा आमदार राहिलेले मनीष सिसोदिया यांना आप पक्षाने जंगपुरामधून रिंगणात उतरवले कारण पटपडगंज हा आपसाठी अवघड मतदारसंघ म्हणून पाहिला जात होता. ग्रेटर कैलासमध्ये, आपचे कैलास भारद्वाज हे भाजपाच्या शिखा रॉय यांच्याकडून ३,१३९ मतांनी पराभूत झाले. येथे काँग्रेसचे उमेदवार गरवित सिंघवी यांना ६,७११ मते मिळाली. तीन वेळा आमदार असलेले कैलास भारद्वाज अरविंद केजरीवाल यांच्या अंतर्गत गृह, आरोग्य, ऊर्जा आणि शहरी विकास या खात्यांसह कॅबिनेट मंत्रीही होते आणि त्यांच्याकडून विजयाची अपेक्षा होती. मालवीय नगरमध्ये, आपचे आणखी एक लोकप्रिय उमेदवार, सोमनाथ भारती हे भाजपाचे माजी नगरसेवक सतीश उपाध्याय यांच्याकडून १,९७१ मतांनी पराभूत झाले. काँग्रेसचे उमेदवार जितेंद्र कुमार कोचर यांना ६,५०२ मते मिळाली.

सर्वोच्च न्यायालय आणि दिल्ली उच्च न्यायालयातील वकील असलेल्या भारती २०१३ पासून मालवीय नगर येथील विद्यमान आमदार होत्या.

उपसभापती राखी बिर्ला या आणखी एक प्रमुख आप नेत्या होत्या, ज्या काँग्रेसने जिंकलेल्या फरकापेक्षा जास्त मते मिळवल्यानंतर पराभूत झाल्या. तीन वेळा मंगोलपुरीचे आमदार राहिलेल्या बिर्ला यांना यावेळी एससी–राखीव मादीपूरमधून उमेदवारी देण्यात आली. त्यांचा भाजपाच्या कैलाश गंगवाल यांच्याकडून ११,०१० मतांनी पराभव झाला, तर काँग्रेसचे उमेदवार हनुमान सहाय यांना १७.९५८ मते मिळाली. राजिंदर नगरमध्ये दुर्गेश पाठक यांचा भाजपाच्या उमंग बजाज यांच्याकडून १,२३१ मतांनी पराभव झाला. काँग्रेसचे उमेदवार विनीत यादव यांनी येथे ४,०१५ मते मिळवली. संगम विहारचे आमदार दिनेश मोहनिया हे भाजपाच्या चंदन कुमार चौधरी यांच्याकडून सर्वात कमी फरकाने केवळ ३१६ मतांनी पराभूत झाले. काँग्रेसचे हर्ष चौधरी यांना याठिकाणी ६,१०१ मते मिळाली. बदली, छतरपूर, मेहरौली, नांगलोई जाट, तिमारपूर आणि त्रिलोकपुरी अशाच प्रकारे आप उमेदवारांचा पराभव झाला. काँग्रेसने किमान १३ जागांवर आपच्या उमेदवारांच्या विजयाची शक्यता खराब केली असली तरी काँग्रेस एकही जागा जिंकू शकली नाही.

-------------

### परळीत होणार पशुवैद्यकीय

मुलभूत सोयीसुविधांचे निरीक्षण व भारतीय पशू चिकित्सा परिषद नवी दिल्ली यांचे मानकानुसार आवश्यक असलेल्या बाबींच्या अनुषंगाने विद्यापीठ स्तरिय निरीक्षण समिती गठीत करण्यात आली असून या समितीचे अध्यक्ष तथा पशू विज्ञान विद्यापीठाचे डीन डॉ. एस व्ही. उपाध्ये, डॉ. जी. एस. खांडेकर, कनिष्ठ अभियंता डॉ. पी.व्ही. तायडे, तांत्रिक अधिकारी डॉ पी. इ. ताकसांडे हे रविवारी जागेची पाहणी करण्यासाठी येणार आहेत. बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक तसेच सर्व संबधित अधिकारी यावेळी उपस्थित राहणार आहेत.

----------

### कॉपी करणे आता

९४ हजार बारावीचे विद्यार्थी, तर १६ लाख ७ हजार दहावीचे, असे एकूण ३१ लाखांवर विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. परिक्षेसाठी तब्बल १ लाख ८० हजारांहून अधिक मनुष्यबळ कार्यरत करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना काही अडचण असेल तर समुपदेशक नेमण्यात आले आहेत. त्यांची मदत विद्यार्थ्यांना घेता येईल. पण कॉपी करणे मात्र परीक्षार्थी विद्यार्थ्यांना महागात पडेल, असे शिक्षण मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी सांगितले. परीक्षेच्या पार्श्वभूमीवर विविध बैठका झाल्या असून विद्यार्थ्यांसाठी नियमावली जाहीर करण्यात आली आहे.

------------

### तीन भावांनी राज्यातील लाखो

मात्र, या योजनेंतर्गत अनेक अपात्र महिलांनी अर्ज केल्याचे पुढे आले आहे. या महिलांविरोधात कारवाई करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या कारवाईनुसार आतापर्यंत पाच लाख महिलांना अपात्र ठरवण्यात आले आहे. आता त्यांना या योजनेंतर्गत देण्यात येणारा लाभ मिळणार नाही. या मुद्द्यावरून विरोधकांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. सरकारने पाच लाख बहिणींना अपात्र केले असून आणखी काही लाख बहिणींना असेच अपात्र केले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. सरकारने लाभार्थी बहिणींना अपात्र ठरवण्याची कृती म्हणजे लाडक्या बहिणींशी केलेली गद्दारी असा हल्लाबोल नाना पटोले यांनी केला. नाना पटोले म्हणाले की, लाडकी बहीण ही योजना केवळ विधानसभा निवडणुकीत माताभगिनींची मते मिळवण्यासाठी होती, निवडणुकीनंतर भाजपा युती त्यांचे खरे रंग दाखवील असे आम्ही सातत्याने बजावले होते आणि शेवटी महायुतीच्या भावांनी लाडक्या बहिणींना सावत्रपणाची वागणूक देण्यास सुरुवात केली. आधी सरसकट १५०० रुपये दिले आणि सत्तेवर आल्यानंतर दरमहा २१०० रुपये देण्याचे आश्वासन दिले. मात्र, २१०० रुपये देण्याचे दूरच राहिले, आहे त्या योजनेतील लाभार्थ्यांना निकष, नियम व अटी लावून योजनेच्या लाभापासून वंचित ठेवले जात आहे, असे पटोले म्हणाले.

**राज्यातील लाखो माता भगिनींची फसवणूक**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील लाखो माता भगिनींची फसवणूक केली आहे. योजना लागू करतानाच निकष ठरवले गेले पण मते मिळवण्यासाठी शिंदे – भाजपा सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले आणि आता सत्ता मिळाल्यानंतर मात्र बहिणींना निकष लावून पैसे देणे बंद करत आहेत हे दुर्दैवी आहे.

------------

### क्रीडा महोत्सवातून उत्कृष्ट

विजयाच्या उन्मादाने वागायचे नाही आणि पराभवाने खचून जायचे नाही ही भूमिका ठेवून विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात नाव कमवावे असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले. जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा महोत्सवाचे पारितोषिक वितरण करताना ते बोलत होते. शारदा स्पोर्ट्स ॲकडमीच अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या नेतृत्वाखाली जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा महोत्सवाच्या पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन शारदा विद्या मंदिर गेवराई येथे करण्यात आले होते. यावेळी आ.विजयसिंह पंडित, सरपंच संघटनेचे अध्यक्ष कालिदास नवले, नगरसेवक शाम येवले, युवानेते पृथ्वीराज पंडित, डॉ.अशोक काळे, दत्ताभाऊ पिसाळ, नवीद माशायक, दीपक आतकरे, खाजा मामू, विष्णुपंत घोंगडे, संतोष सुतार, दिनेश घोडके, वसिम फारोकी, विजय सुतार, सरवर पठाण, संदीप मडके, दत्ता दाभाडे यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

**जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या वतीने आ.विजयसिंह पंडित यांचा हृदय सत्कार**

कार्यक्रमात जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या वतीने आ.विजयसिंह पंडित यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना विजयसिंह पंडित म्हणाले की, पराभवाला खचून न जाता एक ध्येय ठेवून मी काम सुरु केले. कामात सातत्य ठेवले. लोकामध्ये मिसळत गेलो. त्यामुळे मला नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे. शिवछत्र परिवार हा व्यापक आहे. शिवछत्र परिवारातील प्रत्येक सदस्याने माझ्यासाठी लोकामध्ये जाण्याचा प्रयत्न केला त्यामुळेच मला हे यश मिळाले. माय बाप मतदारांचे आशीर्वाद, कार्यकर्ते आणि जयभवानी व जगदंबा शिक्षण संस्थेतील प्रत्येक कर्मचार्याने प्रामाणिकपणे मेहनत आणि कष्ट केल्यामुळे मला प्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी मिळाली असून आपल्याला जमिनीवर राहून काम करायचे आहे. आदरणीय शिवाजीराव दादा पंडित यांच्या लोकसेवेचा वारसा पुढे घेऊन जाण्यासाठी आपल्याला सर्वांना मिळून काम करायचे आहे. गेवराई विधानसभा मतदार संघामध्ये मोठे काम करून एक आदर्श निर्माण करायचा आहे असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कबड्डी, व्हॉलीबॉल, खो–खो, बॅडमिंटन, बुद्धीबळ, स्पर्धेतील विजेत्या खेळाडूना पारितोषिकाचे वितरण करण्यात आले. यावेळी उत्कृष्ट प्रशिक्षक म्हणून ज्ञानेश्वर धापसे, अमोल राठोड यांचा सत्कार करण्यात आला. उत्कृष्ट खेळाडू म्हणून यशराज तिपाले, ज्योती तागड, करण पवार, सखू राठोड, कार्तिक वाघ, अमृता ठोंबरे, अतिश पवार, ऋतुजा बावचकर, देवराज निकम, अमर घाडगे, कोळेकर अश्विनी यांचाही सत्कार करण्यात आला. उत्कृष्ट शाळा म्हणून शिवशारदा पब्लिक स्कूलचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मागील तिन वर्षापासून क्रीडा महोत्सव उत्कृष्ट पद्धतीने आयोजित केल्या बद्दल शिवशारदा पब्लिक स्कूलच्या वतीने रणवीर पंडित यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दादाराव काकडे व सुधीर गाडे यांनी केले. उपस्थितांचे आभार जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर यांनी मानले. यावेळी सहप्रशासन अधिकारी प्रा.काशिनाथ गोगुले, प्रताप हातोटे, प्राचार्य डॉ.विश्वास कदम, डॉ.सदाशिव सरकटे, डॉ.राजाभाऊ चव्हाण, प्राचार्या क्षीरसागर, मुख्याध्यापक राजेंद्र जगदाळे, किशोर पंडित, वसंत राठोड, रणजीत सानप, दत्तात्रय देशपांडे, तौर अशोक, सय्यद युनुस, अरुण हाटकर, भक्तराज पौळ, शिवाजी पाटोळे, भागवत राऊत, पवार बबन, पवार विश्वनाथ, पवार मुरलीधर, संतराम राठोड, लक्ष्मण काळे, दिलीप पवार, विजय येवले, बोरुडे सुनील, महारुद्र राख, रोहिणी लाखुटे, रमेश डावकर, राजूरकर उमेश, हरिभाऊ हाकाळे यांच्यासह सर्व शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, पालक व क्रीडा प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

--------------

DAILY RAJYA LOKTANTRA DATE-09-02-2025

**CHANGE IN NAME**

I DECLARED BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME

OLD NAME

NAJMIN SHAIKH

NEW NAME

NAZMEEN SHAIKH TAREKH

ADDRESS NAIKWADI MOHALLA MADINA CHOWK AMBAD JALNA 431204

MOBILE NO 9665288786

## इ.५ वी व इ.८ वी शिष्यवृत्ती परीक्षा जिल्ह्यातील ८० केंद्रावर होणार

बीड । प्रतिनिधी

पूर्व उच्च प्राथमिक परीक्षा इयत्ता ५ वी व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ८ वी दिनांक ९ फेब्रुवारी २० २५ रोजी बीड जिल्ह्यातील ११ तालुक्यात ८० केंद्रावर घेतली जाणार असून इयत्ता पाचवीसाठी १०६७६ व इयत्ता आठवीसाठी ८१०९ विद्यार्थी परीक्षा देणार असल्याची माहिती बीड जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांनी दिली आहे.सकाळी ११:३० ते १२:३० या वेळेत व दुपारी ०२:०० ते ०३:३० या वेळेत परीक्षा घेण्यात येणार आहे.

या परीक्षेसाठी इयत्ता पाचवी साठी आंबेजोगाई( ८) आष्टी(७)बीड(७)गेवराई(५)केज(३) माजलगाव(४)पाटोदा(३)धारूर(२)परळी(४) शिरूर(का.)-३,वडवणी(१) ४७ केंद्रावर तर इयत्ता ८ वी साठी अंबाजोगाई((४)आष्टी-४,बीड-५,गेवराई-क,केज-३,माजलगाव-३,पाटोदा-२,धारूर-२,परळी-३,शिरूर(का.)-२ व वडवणी-१अशा ३३केंद्रावर परीक्षा घेण्यात येईल. या परीक्षेसाठी ११ तालुका समनव्यक म्हणून गटशिक्षणाधिकारी यांची नियुक्ती केली असून केंद्रसंचालक, उपकेंद्रसंचालक, पर्यवेक्षक, व शिपाई यांची नियुक्ती प्रत्येक परीक्षा केंद्रावर केली आहे.परीक्षा सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी प्रत्येक परीक्षा केंद्रावर पोलीस बंदोबस्त नियुक्त केला असून जिल्हा स्तरावरून तालुक्यातील केंद्रांना भेटी देण्यासाठी भरारी पथकाची नेमणूक केली आहे.अंबाजोगाई-भगवान फुलारी शिक्षणाधिकारी(प्रा.),आष्टी-नागनाथ शिंदे शिक्षण अधिकारी( मा.)परळी(वै)-संजय पंचगल्ले-शि.अ. योजना,बीड-श्रीम.मैना बोराडे-उपशिक्षणाधिकारी, वडवणी-वीर.बी. टी. लेखाधिकारी वर्ग-२,माजलगाव- मोहन काकडे उपशिक्षणाधिकारी, पाटोदा- नानभाऊ हजारे,उपशिक्षणाधिकारी, केज-मिलिंद तुरूकमारे विस्तार अधिकारी, शिरूर(का.)-राऊत रंगनाथ अधीक्षक वर्ग-२,गेवराई-विठ्ठल राठोड-विस्तार अधिकारी, धारूर-भगवान सोनवणे, विस्तार अधिकारी यांची नियुक्ती केली आहे. जिल्हा स्तरावर परिरक्षक तथा परीक्षेचे जिल्हा समनव्यक म्हणून तुकाराम पवार,शालेय पोषण अधीक्षक वर्ग-२ हे काम पाहत आहेत.

# अपयश तात्पुरते असते त्याला घाबरू नका -विश्वास पाठकांचा युवकांना सल्ला

## महाविद्यालयीन जीवनात सुसंगतता अत्यंत महत्वाची -नवनाथ बन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

संघ विचार परिवाराच्या कुळातून शैक्षणिक क्षेत्रात काम करणार्या भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या यशाची उज्वल परंपरा असून संस्थेची शतकाकडे वाटचाल खुप मोठा टप्पा म्हणावा लागेल. त्यासाठी त्याग, तपश्चर्या तितकीच महत्वाची असुन ज्या संस्थेने स्व.प्रमोदजी महाजन, स्व.गोपीनाथराव मुंडे यांचे कार्यकर्तृत्व घडविले, तिथे येण्याचे भाग्य मला मिळाले हे माझे नशीब. परिस्थिती कशीही आली तरी प्रामाणिकपणे काम केले तर निश्चित यश मिळते, अपयशाला घाबरू नका कारण ते तात्पुरते असते असा मौलिक युवकांना सल्ला महावितरण स्वतंत्र संचालक तथा भाजपाचे सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांनी दिला. दरम्यान महाविद्यालयीन जीवनात सुसंगत कुणाची ? यावर आपले करिअर घडते. राष्ट्र



विचाराने प्रेरित असलेल्या संस्थेतून व्यक्तीमत्व विकास झाल्याशिवाय रहात नाही. माझ्या जीवनात या संस्थेचे अत्यंत महत्वाचे स्थान असल्याचे प्रतिपादन भाजपा माध्यम विभागाचे प्रदेश प्रमुख नवनाथ बन यांनी केले.

या कार्यक्रमास केज विधानसभेच्या कार्यसम्राट आमदार सौ.नमिताताई मुंदडा यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी बोलताना आमदार मुंदडा यांनी स्नेह संमेलन हा विद्यार्थ्यांसाठी आनंदाचा दिवस असून विविध स्पर्धेच्या माध्यमातून व्यक्तीमत्वाचा विकास होतो. भारतीय शिक्षण प्रसारक ही संस्था माझी असल्याने आपलेपणाचे नातं वेगळंच असल्याचे त्या म्हणाल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलुरकर होते. संस्थेच्या येथील खोलेश्वर महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवर बोलत होते. व्यासपीठावर संस्था कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य, प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे, डॉ.कल्पनाताई चौसाळकर, किरण दादा कोदरकर, अविनाश तळणीकर, वर्षाताई मुंडे, आप्पाराव यादव, ॲड.शरद इंगळे, खो-खो आंतरराष्ट्रीय स्पर्धेत प्रथम आलेल्या कु.प्रियंका इंगळे यांची विशेष उपस्थिती होती. मान्यवरांच्या शुभ हस्ते दिप प्रज्ज्वलन झाल्यानंतर उपस्थित अतिथींचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातुन महाविद्यालयाची ओळख प्राचार्या डॉ.प्रिती पोहेकर यांनी करून दिली. संस्थेच्या वतीने कु.इंगळे हिचा सन्मान करण्यात आला.आपल्या भाषणात विश्वास पाठकांनी संस्थेच्या यशाचे कौतुक करताना कोणतीही संस्था तपश्चर्यानेच प्रगतीच्या दिशेने चालते. २०४७ पर्यंत भारत हा विश्वगुरू होईल. त्यासाठी अशा संस्थेची अत्यंत भुमिका महत्वाची वाटते. कारण, एक चांगला भारतीय नागरिक माध्यमांतुन घडविल्या जातो. जीवनात एखादी संधी मिळाली तर आपल्याच कामातुन त्या संधीचा आनंद घेता येतो. मात्र प्रामाणिक हा सद्गुण टिकण्यासाठी त्यागाने काम करावे लागते. कठोर परिश्रम त्याचबरोबर विनम्रता हा खर्या अर्थाने अलंकार आनंदी जीवनाचे रहस्य असल्याने संकटं कितीही आले तरी परिस्थितीवर मात करू शकतो. तुम्ही अपयशाला घाबरू नका. कारण, तात्पुरते अपयश असते. त्यामागे छान यश दडलेले असुन जिद्द, चिकाटी आणि आपल्या भविष्यासाठी अध्ययन महत्वाचे त्यासाठी काम करावे लागणार. यावेळी त्यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या कर्तृत्वाचे उदाहरण दिले. वयाच्या तीस वर्षांपर्यंत करिअरवर फोकस मुला-मुलींनी केले तर जीवनात आपण काहीतरी मिळाल्याशिवाय राहू शकत नाहीत हा सल्ला त्यांनी दिला. आणि कार्यक्रमात नवनाथ बन यांनी प्रभावीपणे विचार व्यक्त केले. स्नेह संमेलन सर्वांत मोठा उत्सव असुन खोलेश्वर सारख्या राष्ट्र विचाराने प्रेरित महाविद्यालयात तुमचे शिक्षण होते हेच खरे भाग्य. संस्थेला राष्ट्र विचाराची परंपरा असुन तुम्ही चांगल्या सद्गुणांचे पाईक त्यामुळे भविष्य उज्वल निश्चित होणार. आयुष्याचे मैदान गाजवायचे असेल तर सुसंगत चांगली ठेवा हा महत्वाचा सल्ला त्यांनी दिला. अध्यक्षीय समारोप करताना डॉ.सुरेंद्र आलुरकर यांनी आपल्या संस्थेला पंच्चाहत्तर वर्षे होवुन गेले. शतकाकडे वाटचाल करताना राष्ट्रहित हिच भावना रूजविण्याचा आमचा प्रयत्न विकसित भारतासाठी महत्वाचा राहणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली. आदर्श शिक्षक कसा असावा याचे उदाहरण देखील त्यांनी दिले. यावेळी कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य, राम कुलकर्णी यांची समायोचित भाषणे झाली. सुत्रसंचालन कु.पुजा शिंदे, धनश्री यादव, प्रा.तृप्ती आडेकर, प्रा.मृणाल गोरे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार उपप्राचार्य प्रा.बिभीषण फड यांनी मानले. प्रा.शैलेष पुराणिक यांनी वैयक्तिक पद्य सादर केले.

## जवाहर प्राथमिक शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

माजलगाव । प्रतिनिधी

केसापुरी वसाहत येथील जवाहर प्राथमिक विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्याच्या उद्देशाने प्रतिवर्षी प्रमाणे या वर्षीही वार्षिक स्नेह संमेलन आयोजित केले होते.दि २ फेब्रुवारी रोजी मोठ्या जल्लोष करत स्नेह संमेलन संपन्न झाले.

यावेळी अध्यक्षस्थानी नवविकास मंडळाचे अध्यक्ष ॲड एस आर शर्मा तर व्यासपीठावर संस्थेचे कार्यवाह माजी आ डी के देशमुख उपस्थित होते. प्रमुख अतिथी स्मिता लिंबगावकर, आर बी देशमुख, शिरीष देशमुख, डॉ सचिन देशमुख, मु अ अंजली शिंदे, अभिमन्यू इबिते, सुनीता धसकटे, स्नेह स्मेलन प्रमुख दीपाली धोंगडे उपस्थित होते.



अतिशय उत्सहात मुलांनी आपले कला गुण सादर केले. यावेळी बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी संस्थेचे कार्यवाह माजी आ डी के देशमुख यांनी संस्थेची भूमिका मांडली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्योती कुटे यांनी प्रस्ताविक मु अ अंजली शिंदे यांनी तर आभार स्नेह संमेलन प्रमुख दीपाली धोंगडे यांनी केले. धनंजय जाडे आणि गीतमंचने संस्थाची प्रार्थना स्वागत गीत सादर केले. यावेळी आजी माजी विध्यार्थी, पालक यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## ईश्वरचरणी लीन होण्यासारखे सुख कोठेच नाही-अशोक महाराज थोरात

माजलगाव । प्रतिनिधी

चांगले संस्कार घडवण्यासाठी परमार्था शिवाय पर्याय नाही व हरि भजन आणि ईश्वर चरणी लिन होण्यासारखे सुख या त्रिभुवनात कोठेही नाही, देवाच्या नामस्मरणाने जीवनाचे सार्थक होते, जीवनामध्ये पैसा संपत्ती नव्हे तर आपण केलेले सत्कर्म कामाला येते असे प्रतिपादन श्री. ह.भ.प.अशोक महाराज थोरात यांनी माजलगाव तालुक्यातील मोठेवाडी येथील काळा हनुमान मंदीरात सुरु असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या पाचव्या दिवशीच्या किर्तनरूपी सेवेत केले.



पुढे बोलताना ते म्हणाले, जीवनामध्ये पैसा संपत्ती कामाला येत नाही, तर माणुसकी कामाला येते. ईश्वराच्या चरणाची सेवा किंवा त्या ठिकाणी लिन होण्यासाठी तुम्हाला अनेक सत्कर्म करावे लागतात, तुमच्या स्वभावामध्ये खूप चांगले बदल तुम्हाला घडवून आणावे लागतात, आपल्या वढाळ मनाला चांगले वळणावर आणून नंतरच लिन होता येते. त्यासाठी माणुसकी जपा, आई वडीलांची सेवा करा, दिन दुबळ्याची मदत करा असा संदेश त्यांनी दिला.

नाहीं त्रिभुवनीं सुख या समान । म्हणऊनि मन स्थिरावलें ।।१।। धरियेलीं जीवीं पाउलें कोमळीं । केली एकावळी नाममाळा ।।ध्रु.।।

शीतळ होऊनियां पावलों विश्रांती । न साहे पुढती चाली चित्ता ।।२।।

या जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या अभंगातुन भगवंताचे स्वरूप हृदयात कोरून उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.यावेळी मृदगाचार्य राम महाराज गायकवाड,गायनाचार्य गणेश महाराज वाघमारे, लक्ष्मण महाराज पांचाळ,आकाश महाराज कदम यांनी साथ दिली. यावेळी परिसरातील भाविकांची मोठी उपस्थिती होती.

# स्वत:मध्ये सकारात्मक बदल घडवून युवकांनो जग जिंका -डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

युवकांनी सतत स्वतःमध्ये सकारात्मक बदल घडवून आणत स्वतःला 'ट्रान्सफॉर्ममेशन ' प्रक्रियेत ठेवले पाहिजे तरच त्यांच्या व्यक्तिमत्वात सकारात्मक बदल घडून येऊन ते जीवनात आपल्या ध्येयाच्या दिशेने वाटचाल करीत ते ध्येय मिळवू शकतात, जग जिंकू शकतात असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा इंडीयन मेडीकल असोसिएशनचे सांस्कृतिक राज्य प्रमुख डॉ.राजेश इंगोले यांनी केले.

योगेश्वरी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या समारोप प्रसंगी ते प्रमुख व्याख्याता म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे सचिव कमलाकरराव चौसाळकर, संचालक अंगदराव कराड , प्राचार्य एम.व्ही. कानेटकर, उपप्राचार्य आर.व्ही.कुलकर्णी, प्रा.मेजर एस.पी.कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते महापुरूषांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून करण्यात आले. यावेळी बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी, युवा वर्गाने आपल्या व्यक्तित्व आणि व्यक्तिमत्व या दोन गोष्टींकडे विशेषत्वाने लक्ष दिले पाहिजे असे सांगून या गोष्टीं जीवनामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत असे सांगितले. स्वतःमध्ये बदल करीत राहणे ही एक निरंतर प्रक्रिया आहे. त्यामुळे प्रत्येक चांगली गोष्ट आत्मसात करून आपल्या



योगेश्वरी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना शिबिर

व्यक्तिमत्त्वांमध्ये त्या गोष्टीचा समावेश करणे म्हणजेच स्वतःमध्ये ट्रान्सफॉर्मेशन करणे आहे. हे ट्रान्सफॉर्मेशन एका रात्रीत होत नसते तर त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. युवा वर्गाने आपल्या जीवनात ही प्रक्रिया सतत गतिमान केली पाहिजे. युवकांनी अंधश्रद्धा बाजूला सारून विज्ञानवाद स्वीकारला पाहिजे, दैववाद सोडून कर्मवाद स्वीकारला पाहिजे, समाजामध्ये समाज बदलेल ही अपेक्षा ठेवण्यापेक्षा प्रथम मी स्वतःला बदलेल आणि त्यानंतर माझ्या कुटुंबाला बदलेल त्यानंतर समाजाला बदलण्याचा प्रयत्न करेल असे जर ठरविले तर भारत देशाला महासत्ता बनविण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. युवकांनी आपल्याला व्यसनांपासून दूर ठेवले पाहिजे. कारण, व्यसने ही मानवी जीवनाला लागलेला शाप आहे .व्यसनांमुळे आपली, स्वतःची तसेच आपल्या कुटुंबीयांची अधोगती होते. त्यामुळे युवा वर्गाने दारू, गांजा, तंबाखू, गुटखा, मादक द्रव्य मादक औषधे यापासून कोसो दूर राहिले पाहिजे असे आवाहन डॉ.इंगोले यांनी केले. या शिबिरांमधून विद्यार्थ्यांमधल्या विविध कौशल्यांना तसेच नेतृत्वगुणांना वाव मिळतो. त्यामुळे महाविद्यालयांनी अशी शिबिरे सतत ठेवण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन ही डॉ.राजेश इंगोले यांनी केले. अध्यक्षीय समारोप करताना संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर यांनी योगेश्वरी महाविद्यालयाचे विद्यार्थी आंतरराष्ट्रीय पातळीवर संस्थेचे नांव उज्वल करीत आहेत. त्यांची ही गौरवशाली परंपरा प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपल्या परीने पुढे नेण्याचा प्रयत्न करावा महाविद्यालय संपूर्ण ताकदीने विद्यार्थ्यांच्या पाठीमागे उभी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये यश मिळविण्यासाठी आपला तसाच महाविद्यालयाचा नांवलौकीक करण्यासाठी सतत प्रयत्न केला पाहिजे असे यथोचित मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य मारूती कानेटकर यांनी केले तसेच उपप्राचार्य आर.व्ही.कुलकर्णी व प्रा.मेजर एस.पी.कुलकर्णी यांनी प्रासंगिक मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजनचे कार्यक्रमाधिकारी डॉ.महेंद्र आचार्य यांनी अहवाल वाचन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ.महेंद्र आचार्य व डॉ.एस.डी.घन यांनी प्रयत्न केले.

## संवाद चिमुकल्यांशी : आदिवासी मंत्र्यांचा नवोपक्रम थेटेगव्हाण आश्रम शाळेवर अधिकारी मुक्कामी

वडवणी । प्रतिनिधी

राज्याचे नवनियुक्त आदिवासी विकास मंत्री महोदय डॉ.अशोक ऊईके साहेब यांनी.आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थी आणि कर्मचारी यांना शैक्षणिक ज्ञानदानचं कार्य करत असताना.भौतिक सुविधाच्या अभावामुळे येणाऱ्या अडचणी,अडथळे त्यांच्या समस्या. या समस्यांमुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी. सर्वगुणसंपन्न विद्यार्थीचे व्यक्तिमत्व घडवण्यासाठी.शाळांमध्ये बऱ्याचशा शाळांना अनेक भौतिक सुविधांचा अभावामुळे तेथील ज्ञानदानाचे कार्य करण्यासाठी अडचण निर्माण होत आहे. तेथील समस्या तेथील विद्यार्थ्यांच्या असलेल्या अडचणींचा उलगड हा प्रत्यक्षा त स्वतः घेण्यासाठी.महाराष्ट्रातील सर्वच शासकीय ४९७ आदिवासी आश्रम शाळेमध्ये ''संवाद चिमुकल्याशी'' या नवोपक्रमा अंतर्गत.प्रत्येक आदिवासी आश्रम शाळेवर एक दिवस अधिकारी मुक्कामी राहुन . विद्यार्थ्यांचे चौवीस तासांचे दैनंदिन कार्य कशा पद्धतीने चालतं.त्यांना कोणत्या समस्या



उद्भवतात,अडचणींना सामोरे जावे लागते.अशा सर्वच गोष्टी जाणून घेण्यासाठी आणि त्यावर उपाययोजना काय करता येतील.कोणत्या योजना आखून त्याची अंमलबजावणी करून या समस्या दूर करून.आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी लागण्यासाठी.नवचैतन्य निर्माण करण्यासाठी प्रत्यक्ष मंत्रिमहोदय यांच्या संकल्पनेतून आदिवासी आश्रम शाळेमधील समस्या जाणून घेण्यासाठी आणि त्या स्वतः अनुभवण्यासाठी.'' संवाद चिमुकल्यासी '' या नवोपक्रमात. आदिवासी विकास विभाग,प्रकल्प छत्रपती संभाजीनगर या प्रकल्पांतर्गत असलेले शासकीय माध्यमिक आश्रम शाळा थेटेगव्हाण ता.धारूर जि.बीड या शाळेने सुद्धा या उपक्रमामध्ये प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी श्रीमती.चेतना मोरे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली व शाळेचे पालक अधिकारी छत्रपती संभाजीनगर प्रकल्प कार्यालयातील सहप्रकल्प अधिकारी श्री.उल्हासजी चव्हाण सर यांच्या शाळेमधील प्रत्यक्ष उपस्थितीमध्ये ऑनलाइन पद्धतीने या मंत्री महोदय यांच्या नव उपक्रमामध्ये.शासकीय माध्यमिक आश्रम शाळा थेटेगव्हाण या शाळेने सहभाग नोंदवला.

श्री.उल्हास चव्हाण साहेबांनी शाळेवर मुक्कामी राहत.शाळेतील दैनंदिन विद्यार्थ्यांची दिनचर्याचे निरिक्षण करत. भौतिक सुविधांच्या अभावामुळे समस्या, अडचणी याची प्रत्यक्ष नोंद घेत. विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेतल्या. शाळेचे मुख्याध्यापक श्री.सखाराम वनवे सर सर्व शिक्षक व शिक्षक इतर कर्मचारी यांनी सुद्धा भौतिक सुख सुविधांचा असलेल्या अभाव त्यामुळे येत असलेल्या समस्या,अडचणी निदर्शनास आणून दिल्या.विद्यार्थ्यांशी संवाद साधताना श्री. उल्हास चव्हाण साहेबांनी आपल्या समस्या,येत असलेल्या अडचणी याची नोंद घेतली असून.त्या वरिष्ठांकडे त्याचा पाठपुरावा करून आपल्या समस्या दूर करण्यासाठी नक्कीच मी सतत प्रयत्न करत राहील.तुम्ही मात्र सध्याच्या असलेल्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करत विद्यार्थ्यांना त्याच्या परिस्थितीची जाणीव करून देऊन.त्याला शिक्षणाचा लळा आणि गोडी निर्माण करुन विद्यार्थ्यांना घडवा असा मोलाचा संदेश सरांनी.विद्यार्थी आणि शिक्षक कर्मचारी बांधवांशी संवाद साधताना दिला. विद्यार्थ्यांच्या सर्वगुण संपन्न व्यक्तिमत्व घडवण्यासाठी थेटेगव्हाण आश्रम शाळेच्या शिक्षकांची टीम कटिबद्धच नव्हे..! तर आम्ही बांधील आहोत असे कार्यक्रमाप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री सखाराम वनवे सरांनी उपस्थितांसमोर सांगितले.या संवाद चिमुकल्याणशी नवोपक्रमासाठी शाळेतील शिक्षक श्री. परमेश्वर तावसे,श्री.नागनाथ चात्रे,श्री नागनाथ भरडे,श्री.गोरक्षनाथ आबुज,श्री प्रकाश काडलिंगे,श्री.विनायक कुलकर्णी,श्रीमती.सारिका डोंगरे मॅडम, श्रीमती.पुनम लांब मॅडम,श्री.राहुल करे.श्री.बालाजी लोभे,श्री.भारत बडे,श्री अशोक मुंडे,श्री.शिवाजी घुले,श्री.हनुमान केंद्रे तसेच विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांची उपस्थिती होती.शेवटी वंदे मातरम ने सांगता करण्यात आली.


पान ६ वरून...


### सुरूडी आश्रमशाळेमध्ये संवाद

विकास प्रकल्प छत्रपती संभाजी नगरचे श्री विनोदकुमार सांगळे साहेब यांनी सात तारखेला सकाळपासून ते आठ तारखेला दुपारपर्यंत हजेरी लावली.साहेबांनी आल्यानंतर विद्यार्थ्यांचे अध्ययन अध्यापन विषयी चर्चा करत सर्व वर्गांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांशी भेट घेतली. सर्व शिक्षकांची चर्चा करत विद्यार्थ्यांशी हितगुज केली.विद्यार्थ्यांनी आपापले वर्ग सजावट केलेले होते हे पाहून साहेबांनी त्यांचे अभिनंदन केले, दुपारच्या वेळी साहेबांनी सर्व चिमुकल्यासोबत जेवणाचा आस्वाद घेतला व जेवणाचा दर्जा अतिशय छान असल्याने सर्व स्वयंपाकी , कामठी, कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. रात्रीच्या जेवणानंतर चिमुकल्या विद्यार्थ्यांनी साहेबांसमोर विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला, यामध्ये विद्यार्थ्यांनी गाणे म्हणणे , नृत्य सादर करणे, गोष्टी सांगणे, त्याचबरोबर नाटिका सादर करणे , भाषण अशा विविध उपक्रमांचा समावेश होता.दुसऱ्या दिवशी सकाळी योगा, प्राणायाम याने दिवसाची सुरुवात झाली. सकाळच्या नाश्त्यानंतर शालेय परिपाठ व कवायतचे आयोजन करण्यात आले, यामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी उत्तम प्रकारे कवायत सादर केली. सुरुडीच्या शाळेच्या सॅटर्डे ॲक्टिव्हिटी डे मध्ये आदरणीय साहेबांनी सहभाग घेतला व यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो असे प्रतिपादन केले. शेवटी जाताना सुरुडी शाळेचा शैक्षणिक दर्जा, त्याचबरोबर विद्यार्थ्यांचा होणारा सर्वांगीण विकास , त्यांना दिल्या जाणाऱ्या सर्व सुविधा बाबत साहेबांनी समाधान व्यक्त केले. प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक सुधाकर राठोड, नीता मुंडे, संभाजी मुसळे, शिवाजी गांधले, संतोष मेहत्रे, विशाल दोरगे, प्रतीक्षा मेश्राम, सुरज शिंदे , केतन काकडे, प्रवीण पुंड, संगीता जाधव, अमित पवार, निलेश आहेर , वैजनाथ आतकरे , प्रियंका नवले, प्रशांत सरोदे, मदन सावंत, शाहूराव सानप , किसन शिंदे , वेणूबाई केसकर , मोहन जाधव, मच्छिंद्र शिरसाट, आदी कर्मचारी उपस्थित होते.

### ॲड.शिवाजी कांबळे

केले आहे. ॲड.कांबळे हे अंबाजोगाई येथील दिवाणी व फौजदारी तसेच जिल्हा व सत्र न्यायालय येथे विधीज्ञ म्हणून कार्यरत आहेत. कायदेशीर दस्तऐवजांवर स्वाक्षरी करण्यासाठी अधिकृत व्यक्ती म्हणून नोटरी हे फार महत्त्वाचे आहे. व्यवहार योग्य रीतीने पार पाडले जातील, याची खात्री करण्यासाठी आणि फसवणूक रोखण्यासाठी कायदेशीर कागदपत्रे नोटरी केली जातात. भारत सरकारच्या विधी व न्याय मंत्रालयाने नोटरीचे प्रमाणपत्र देऊन नोटरीपदी निवड केली. नियुक्तीचे रितसर प्रमाणपत्र त्यांना प्राप्त झाले आहे. ॲड.शिवाजी देवाजी कांबळे यांची नोटरीपदी नियुक्ती करण्यात आल्याबद्दल बीड जिल्ह्यातील जनतेतून सहर्ष स्वागत होत आहे.

पदाचा वापर समाजासाठी करणार :

मला मिळालेल्या नोटरी पदाचा वापर हा आगामी काळात समाज हितासाठी व सर्व नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी केला जाईल.

- ॲड.शिवाजी कांबळे (नवनियुक्त नोटरी)

### शिरूरच्या चार

सिंदफणा अर्बन बँकेच्या वतीने संस्थापक तथा सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांनी चौघांचाही एकत्र सत्कार करून शुभेच्छा दिल्या.यावेळी सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांचेसह पत्रकार प्रकाश साळवे,व्यवस्थापक राम सुरे,कॅशीअर समर्थ गोसावी,क्लार्क महेश पवार,कृष्णा बनकर यांचेसह आदींची मोठया संख्येने उपस्थिती होती.

### वसंतदादा पाटील महाविद्यालयातील

यांनीही विद्यार्थ्यांना मनोगतातून प्रेरणादायी संदेश दिले. प्रमुख अतिथी संदीप जाधव यांनी विद्यार्थ्यांना व्यसनांपासून अलिप्त राहण्याचे आवाहन केले. ह.भ.प. प्रियंकाताई अडसूळ यांनी उत्तम दाखला देत जीवनात कष्ट घेतल्याशिवाय यश मिळत नाही असे प्रतिपादन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विठ्ठल शिंदे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. शेख इरफान यांनी केले. आभारप्रदर्शन प्रा. पिंटू रोडे यांनी केले. निरोप समारंभास विद्यार्थी व प्राध्यापक बहुसंख्येने उपस्थित होते.

### कौटुंबिक संस्काराची शिदोरी

म्हणजे मुख्य वक्ते प्रा. संजय बागुल सर यांचे प्रभावी भाषण. त्यांनी आपल्या मनोगतात माता रमाई यांच्या संघर्षमय जीवनावर प्रकाश टाकत, ''कौटुंबिक संस्कारांची खरी शिदोरी माता रमाईंकडून शिकावी'' असे प्रतिपादन केले. माता रमाई यांनी बाबासाहेब आंबेडकरांना पाठिंबा देत मोठ्या त्यागाने आणि संयमाने आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. त्यांच्या त्यागातून आपल्या कुटुंब व्यवस्थेत समतोल राखण्याची शिकवण मिळते, असेही त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमात क्रांतिसूर्य संस्थेच्या संपूर्ण टीमला सन्मानित करण्यात आले, तसेच आयोजकांनी उत्कृष्ट नियोजन करून संपूर्ण गावाला एकत्र आणले. संयोजकांचे आणि आयोजकांचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे, कारण त्यांनी गावाची एकजूट आणि सामाजिक कार्य करण्याची ताकद दाखवून दिली. रमाई नगर, सावरगाव येथील महिला मंडळाच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. जयंती कमिटीच्या अध्यक्षस्थानी प्रदीप भैय्या फंदे, उपाध्यक्ष गणेश कुव्हारे, सचिव दीपक बोराडे आणि कोषाध्यक्ष प्रवीण कुव्हारे यांनी जबाबदारी पार पाडली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. धम्मानंद बोराडे, रंजीत वाघमारे, प्रल्हाद बोराडे सर, मुंजाबा कुव्हारे सर, सत्यप्रेम फंदे, बबलू फंदे, सुशिम बोराडे, अक्षय त्रिभुवन, राहुल कुव्हारे, शाम बोराडे, गोकुळदादा वाघमारे, प्रकाश बोराडे, अप्पा फंदे, अक्षय बोराडे, मुकेश कुव्हारे, सूरज शिनगारे, योगेश शिनगारे, संजय फंदे, राजेश सोनकांबळे, राहुल बोराडे, आदित्य बोराडे, प्रणव कुव्हारे बळीनाना थोरात,साहिल गाडेकर साहिल साळवे, सुधीर कूव्हारे,अण्णाभाऊ बोराडे,आबासाहेब बोराडे निखील कुव्हारे आदींनी मेहनत घेतली.

# पीएम किसानच्या हप्त्यात वाढ होणार नाही

## केंद्रीय कृषी राज्यमंत्री ठाकूर यांचे स्पष्टीकरण

पुणे : केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या संसदीय स्थायी समितीने पंतप्रधान किसान सन्मान निधी अर्थात पीएम किसानचा वार्षिक निधी ६ हजारांवरून १२ हजार रुपये करण्याची शिफारस केली होती. परंतु केंद्र सरकारचा सध्या पीएम किसान योजनेचा निधी ६ वरून १२ हजार रुपये करण्याचा कोणताही प्रस्ताव नसल्याचं कृषी व शेतकरी कल्याण मंत्री रामनाथ ठाकूर यांनी पुन्हा एकदा स्पष्ट केले. मंत्री ठाकूर यांनी पीएम किसानच्या निधी वाढीबद्दल विचारण्यात आलेल्या प्रश्नाला राज्यसभेत लेखी उत्तर दिले. समितीने पीएम किसान निधीत वाढ, शेतकरी कर्जमाफी, पीकविमा आणि हमीभाव कायद्याची हमी अशा शिफारशी केल्या होत्या.

मंत्री ठाकूर म्हणाले, ''सध्या पीएम किसान योजनेतील आर्थिक सहाय्य वाढवण्याचा आणि भाडे तत्वावर शेती कसणाऱ्या व शेत मजुरांना पीएम किसान योजनेत समाविष्ट करण्याचा कोणताही प्रस्ताव नाही.'' असं ठाकूर यांनी स्पष्ट केलं. अर्थसंकल्पात पीएम किसानच्या निधीत वाढ केली जाईल, अशी शक्यता वर्तवली जात होती. परंतु अर्थसंकल्पात यासंदर्भात निर्णय घेण्यात आला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचा अपेक्षाभंग झाला. शेतकऱ्यांसंबंधी एका प्रश्नाला उत्तर देताना मंत्री ठाकूर यांनी देशातील शेतकऱ्यांना पीएम किसानचा




फायदा होत असल्याचाही दावा केला. मंत्री ठाकूर म्हणाले, ''पंतप्रधानांनी फेब्रुवारी २०१९ पासून शेत जमीन असलेल्या शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी पीएम किसान योजना सुरू केली. यामध्ये पारदर्शकता ठेवून लाभार्थ्यांची नोंदणी आणि पडताळणी करण्यात आलेली आहे. या योजनेतुन १८ हप्त्यात आत्तापर्यंत ३.४६ लाख कोटी रूपयांहून अधिक रक्कम शेतकऱ्यांना वितरित करण्यात आली आहे.'' असा दावा ठाकूर यांनी केला. मंत्री ठाकूर यांनी उत्तरात आंतरराष्ट्रीय अन्न धोरण संशोधन संस्थेने २०१९ मध्ये केलेल्या अभ्यासाचा संदर्भही दिला. ठाकूर पुढे म्हणाले,''पीएम किसान योजनेतून वितरित केलेल्या निधीमुळे ग्रामीण भागात आर्थिक व्यवहारांना चालना मिळाली आहे. शेतकऱ्यांच्या

### हमीभाव कायद्याची हमी

मंत्री ठाकूर यांनी यावेळी हमीभाव कायद्याच्या हमीबद्दल उत्तर दिलं. ठाकूर म्हणाले, ''समितीने हमीभाव कायद्याच्या हमीमुळे शेतकऱ्यांना आर्थिक स्थिरता येईल, अशी शिफारस केली आहे. परंतु केंद्र आणि राज्य सरकार दरवर्षी कृषी किंमत आणि मूल्य आयोगाच्या शिफारशीनुसार २२ पिकांची किमान आधारभुत किंमत निश्चित करतं. २०१८-१९ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभाव जाहीर करत आहे. खरीप आणि रब्बी हंगामात उत्पादन खर्चावर आधारित ५० टक्के हमीभाव केंद्र सरकार जाहीर करतं.'' असंही ठाकूर यांनी उत्तरात सांगितले.

कर्जाच्या अडचणी कमी झाल्या असून शेतकऱ्यांची निविष्ठामधील गुंतवणूक वाढली आहे.'' असा देखील दावा ठाकूर यांनी केला. तसेच शेतकऱ्यांची जोखीम घेण्याची क्षमता वाढली असून तुलेनेने उत्पादक गुंतवणूक वाढली आहे. त्यामुळे केवळ शेतीच्या गरजा पूर्ण झाल्या असं नाही तर शिक्षण, वैद्यकीय, लग्न अशा प्रकारच्या खर्चाची पूर्तता देखील पीएम किसानच्या निधीमुळे शेतकऱ्यांना करता येऊ लागल्याचा ठाकूरांनी दावा केला.




### महत्वाच्या घटना

१९०० : लॉन टेनिस या खेळातील 'डेव्हिस कप' या करंडकाची सुरूवात झाली.
१९३३ : साने गुरुजी यांनी नाशिकच्या कारागृहात असताना 'श्यामची आई' या पुस्तकाच्या लेखनाला सुरुवात केली.
१९५१ : स्वतंत्र भारताची पहिली जनगणना सुरू
१९६९ : बोइंग-७४७ विमानाचे पहिले चाचणी उड्डाण झाले.
१९७१ : ''अपोलो १४ मिशन'' चंद्रावरून पृथ्वीवर सुरक्षित परत आले.
१९७५ : रशिया चे सुयोज-१७ हे अवकाशयान २९ दिवसानंतर पुन्हा पृथ्वीवर सुरक्षित परत आले.
१९९९ : भारतीय चित्रपट निर्माता शेखर कपूर यांचा एलिझाबेथ हा चित्रपट ऑस्कर साठी नॉमिनेट केल्या गेला.
२००३ : संगीतकार रवींद्र जैन यांना मध्यप्रदेश सरकारचा लता मंगेशकर पुरस्कार प्रदान.
२०१० : बीटी-ब्रिंजल वाणाची शेती करण्यावर काही दिवसासाठी बंदी आली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४०४ : शेवटचा बायझेंटाईन सम्राट कॉन्स्टन्टाईन (अकरावा) यांचा जन्म.
१७७३ : अमेरिकेचे वे९ अध्यक्ष विल्यम हेन्री हॅरिसन यांचा जन्म. (मृत्यू: ४ एप्रिल १८४१)
१९१७ : होमी जे. एच. तल्यारखान - गांधीवादी नेते, सिक्कीमचे पहिले राज्यपाल, मंत्री व आमदार (मृत्यू: २७ जून १९९८)
१९२२ : जिम लेकर - इंग्लिश क्रिकेट खेळाडू (मृत्यू: २३ एप्रिल १९८६)
१९२९ : महाराष्ट्रचे माजी मुख्यमंत्री ए. आर. अंतुले यांचा जन्म. (मृत्यू: २ डिसेंबर २०१४)
१९४० : प्रसिद्ध भारतीय लेखक विष्णू खरे यांचा जन्म.
१९४५ : संसद चे माजी सदस्य श्याम चरण गुप्ता यांचा जन्म.
१९५८ : भारतीय चित्रपट अभिनेत्री अमृता सिंह यांचा जन्म.
१९६८ : भारतीय अभिनेता राहुल रॉय यांचा जन्म.
१९७० : ग्लेन मॅकग्रा - ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज
१९८४ : ला भारतीय अभिनेत्री उदिता गोस्वामी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८७१ : फ्योदोर दोस्तोवस्की - रशियन कादंबरीकार आणि तत्त्वज्ञ (जन्म: ११ नोव्हेंबर १८२१)
१८९९ : भारतीय स्वातंत्र्य सैनिक बालकृष्ण चापेकर यांचे निधन.
१९१८ : प्रसिद्ध भारतीय नृत्यांगना टी. बालासरस्वती यांचे निधन.
१९६६ : दामूअण्णा जोशी - बालमोहन नाटक मंडळीचे संस्थापक. या संस्थेने प्रल्हाद केशव अत्रे यांची अनेक नाटके केली.
१९७९ : राजा परांजपे - चित्रपट दिग्दर्शक, निर्माते आणि अभिनेते (जन्म: २४ एप्रिल १९१०)
१९८१ : एम. सी. छागला - न्यायाधीश, मुत्सद्दी आणि केंद्रीय मंत्री (जन्म: ३० सप्टेंबर १९००)
१९८४ : तंजोर बालसरस्वती - भरतनाट्यम नर्तिका (जन्म: १३ मे १९१८)
२००० : शोभना समर्थ - चित्रपट अभिनेत्री व निर्माती (जन्म: १९१५)
२००१ : माजी हवाई दल प्रमुख, एर चीफ मार्शल दिलबागसिंग यांचे निधन.
२००६ : भारतीय अभिनेत्री नादिरा यांचे निधन.
२००८ : डॉ. मुरलीधर देविदास ऊर्फ बाबा आमटे - कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनासाठी आयुष्य वाहून घेणारे थोर समाजसेवक (जन्म: २६ डिसेंबर १९१४)
२०१२ : प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक ओ. पी. दत्ता यांचे निधन.

# रताळे : हिवाळ्यातील पौष्टिक सुपरफूड



रताळे हे अत्यंत पोषणतत्त्वांनीयुक्त कंद पीक आहे. यामध्ये ऊर्जा, तंतूमय घटक, जीवनसत्त्वे आणि खनिजे समाविष्ट आहेत. पाने आहारासाठी महत्त्वाची आहेत. कंद उच्च कॅरोटीन, जीवनसत्त्व अ आणि तंतुमय घटकांचा उत्कृष्ट स्रोत आहेत. यामध्ये बीटा-कॅरोटीन आणि जीवनसत्त्व अ मोठ्या प्रमाणात आहे. हे घटक दृष्टी आणि रोग प्रतिकारशक्तीसाठी महत्त्वपूर्ण आहेत. तंतुमय घटक पचनशक्ती सुधारण्यात मदत करतात. कॅल्शिअम आणि पोटॅशिअम हाडांच्या आरोग्यासाठी आवश्यक आहे.

हिवाळ्यात रताळे खाणे विशेष फायदेशीर ठरते. बीटा-कॅरोटीन आणि जीवनसत्त्व अ शरीराला आवश्यक पोषण देते. लोह, फोलेट, तांबे, मॅग्नेशिअम आणि जीवनसत्त्व शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती बळकट करतात. जीवनसत्त्व क त्वचेतील कोलेजन निर्माण करण्यात मदत करते, यामुळे त्वचा निरोगी दिसते. तंतुमय मेद पचनप्रक्रियेला साहाय्य करते, यामुळे भूक कमी होऊन रक्तातील साखरेची पातळी संतुलित राहते. रक्ताची वाढ होते. जीवनसत्त्व ब ६ हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. कमी कॅलरी कमी असतात. त्यामुळे वजन कमी करण्यासाठी उत्तम आहे. रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित राहते. तंतूमय घटक आणि कमी कोलेस्टेरॉलचे प्रमाण मधुमेहावर नियंत्रण ठेवते. अँटिऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे आणि ग्लायकोकॉलेट्स शरीराच्या कार्यासाठी महत्त्वाचे आहेत.

आयुर्वेदिक दृष्टिकोनातून रताळ्याच्या पानांचा उपयोग अनेक रोगांच्या उपचारासाठी केला जातो. तंतुमय घटक, जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात, जे शरीराच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. पानांचा उपयोग रोगप्रतिकारकशक्ती, पचनशक्ती सुधारण्यासाठी आणि हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. तंतुमय घटक पचनप्रक्रिया सुधारण्यास मदत करतात. पानातील जीवनसत्त्व क आणि अँटिऑक्सिडंट्स शरीराच्या रोगप्रतिकारक शक्तीला बळकट करतात. पानांमध्ये कमी कॅलरी आणि अधिक तंतूमय घटक असल्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. पोटॅशिअम, मॅग्नेशिअम हृदयाच्या आरोग्यासाठी उपयुक्त आहे. रक्तदाब नियंत्रणात रहातो. पानातील अँटिऑक्सिडंट्स त्वचेतील कोलेजन वाढवतात.

# जनावरांमधील गोचिड ताप

वनस्पती, प्राणी आणि काही सागरी जिवांसह अनेक प्रकारच्या जीवांवर परिणाम करणाऱ्या आजारांसाठी प्रोटोझोआचे संक्रमण जबाबदार आहे. थायलेरिओसिस, बेबेसिओसिस आणि ॲनाप्लाज्मोसिस हे महत्त्वाचे आजार आहेत.

थायलेरिओसिस : विदेशी आणि संकरित गाईंमध्ये हा आजार दिसतो. म्हशींनाही संसर्ग होतो, परंतु लक्षणे सौम्य असतात. ताप, सुजलेल्या लिम्फ नोड्स, श्लेष्मल त्वचा फिकट होते, अशक्तपणा, अनुनासिक स्त्राव, कावीळ, लाळ गळते. जलद आणि उथळ श्वासोच्छ्वास, पाणचट डोळे ही लक्षणे आहेत. जनावरांची स्थिती झपाट्याने खालावते. काही वेळा जनावरे बेशुद्ध पडतात.

प्रतिबंध आणि उपचार : नियमित गोचिड नियंत्रण हा सर्वात प्रभावी उपाय आहे. आजाराची लक्षणे दिसल्यास तातडीने पशुतज्ज्ञांकडून उपचार करावेत. कारण सुरुवातीच्या टप्प्यात उपचार सर्वांत प्रभावी आहे. विलंबामुळे मृत्यू होऊ शकतो. नियंत्रणासाठी तीन महिने किंवा त्याहून अधिक वयाच्या सर्व संकरित जनावरांना एकदा लसीकरण करावे.

ॲनाप्लाज्मोसिस : हा आजार रिकेटसिया जिवाणूमुळे होतो. रक्त दूषित सुया किंवा हातमोजांद्वारे देखील पसरू शकतो. वृद्ध जनावरांच्यापेक्षा वासरे आजारास प्रतिरोधक असतात. ताप, दूध उत्पादनात घट, प्रगतीशील अशक्तपणा, कावीळ, गर्भपात ही लक्षणे आहेत. नंतरच्या टप्प्यात, अशक्तपणा, असंबद्ध हालचाली, श्वास लागणे आणि वेगाने धडधडणारी नाडी सहसा दिसून येते.प्रतिबंध आणि उपचार : सुरुवातीच्या टप्प्यात वेळीच उपचार केल्यास हा आजार बरा होतो.

बेबेसिओसिस : हा आजार प्रोटोझोआमुळे होतो. ताप, अशक्तपणा, श्वासोच्छ्वासाचा दर वाढणे, दूध उत्पादनात तीव्र घट, स्नायूंना हादरे, अशक्तपणा, कावीळ, गर्भपात, बद्धकोष्ठता किंवा अतिसार ही लक्षणे आहेत.

प्रतिबंध आणि उपचार : त्वरित उपचार केल्यास आजार बरा होतो. नंतरच्या टप्प्यात, हिमोग्लोबिन्युरियासह वजन कमी होते. उपचारानंतर २४ तासांनंतर लघवीचा रंग सामान्य झाला तर उपचार पुन्हा करणे चांगले ठरते.




# लेमन ग्रासची शेती करून मिळवू शकता मोठा नफा



सध्याच्या काळात शेतकरी विविध प्रकारे नवनवीन तंत्रज्ञान आणि नवनवीन पिकांचे प्रयोग करताना दिसत आहेत. ज्यातून त्यांना चांगला नफाही मिळतो आहे. असेच एक पीक म्हणजे लेमन ग्रास होय. याचा वापर बहुतांशी कॉस्मेटिक, डिटर्जंट, आणि औषधांमध्ये केला जातो. कमी कालावधी मध्ये तयार होणाऱ्या या पिकाला सध्या चांगली मागणी आहे. औषधी वनस्पती असल्याने याचे बरेच उपयोग आहेत. योग्य तंत्राचा वापर करून या पिकाची लागवड केल्यास चांगला नफा मिळू शकतो. तसेच यासाठी लागणारी गुंतवणूकही कमी असते. याची लागवड केल्यानंतर चार महिन्यांमध्येच हे पीक तयार होते. औषधांसोबतच या पिकापासून बनवलेल्या तेलाला देखील बाजारात चांगली मागणी आहे आणि किमतही चांगली मिळते. या पिकाच्या शेतीचे वैशिष्ट्य म्हणजे या पिकासाठी कोणत्याही प्रकारच्या खताची आवश्यकता भासत नाही. आणि हे पीक एकदा पेरले की पाच ते सहा वर्षापर्यंत ते चालते. याची पेरणी फेब्रुवारी ते जुलै च्या दरम्यान करता येते. एकदा याची पेरणी केली की, पाच ते सहा वेळा याची कापणी करता येते. यापासून तयार केल्या जाणाऱ्या तेलाची किंमत हजार ते दीड हजार रु लिटर अशी असते. एका एकरातून साधारण ५ ते ६ लिटर तेल निघते. गणिती रुपात हिशोब करायचा झाल्यास याच्या लागवडीसाठी ३० ते ४० हजार रु. खर्च येतो आणि एका वर्षात ३ ते ४ वेळा याची कापणी करता येते. म्हणजे साधारण वर्षाकाठी १ ते दीड लाख रु. इतके उत्पादन या पिकातून मिळते. त्यामुळे जर कमी कालावधीत चांगला नफा मिळवायचा असेल तर लेमन ग्रास ची शेती करायला हरकत नाही.

# माती परिक्षण करताना ही काळजी नक्की घ्या !

मातीतील अन्नाशांचे प्रमाण तपासून त्यानुसार खतांच्या मात्रा देणे नेहमीच फायदेशीर असते. मातीचा सामू म्हणजे आम्ल-विम्ल निर्देशांक, पाण्यात विरघळणारे क्षारांचे प्रमाण, चुन्याचे प्रमाण, सेंद्रिय कर्ब, उपलब्ध नत्र, स्फुरद व पालाश तसेच जिप्सम, गंधक यांची जमिनीतील प्रमाण समजण्यासाठी माती परिक्षण ही अतिशय महत्त्वाची चाचणी आहे. शिवाय पृथकरण अहवालावरून आलेल्या निकालाची योग्य वर्गवारी करणेही आवश्यक असते, तसेच त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी केली तरच आपणास त्याचे महत्त्व समजू शकेल. शिवाय जमिनीतील सुक्ष्म अन्नद्रव्ये, भौतीक गुणधर्म व निचरा म्हणजेच थोडक्यात जमिनीचे आरोग्य कशा प्रकारचे आहे हे समजते.

जमिनीच्या सामूवरून जमिनीची आम्लता व विम्लता मोजता येते. सामू सहा पेक्षा कमी असेल तर आम्लयुक्त, ६.५ ते ७.५ च्या दरम्यान योग्य, ८.५ पेक्षा जास्त असेल तर विम्लयुक्त जमीन असते. जमिनीचा सामू व अन्नद्रव्याची उपलब्धता यांचा परस्पर संबंध असून सामू सहा ते सात दरम्यान असेल तर अन्नद्रव्याची उपलब्धताही अधिक रहाते. तसेच क्षारांच्या बाबतीत देखील क्षरांचे प्रमाण हे ०.४ ते ०.८ डेसिसायमन/चौ. मी. पेक्षा कमी असेल तर जमीन चांगली म्हणता येते पण हिर क्षारता १.२ किंवा ३.२ पर्यंत वाढली तर ती जमीन जास्त क्षारयुक्त गटात मोडते. अशा जमिनीत क्षारास प्रतिकार करणारी पीकेच वाढू शकतात मात्र क्षारांचे प्रमाण ३.२ पेक्षा जास्त झाल्यास सर्वसाधारण पिकांकरता अशी जमीन अपायकारक ठरू शकते. माती परिक्षणाचा नमुना



घेण्यावर माती परिक्षणाचे यश अवलंबून असते. मातीचा अरोग्य नमुना घेतल्यास मृद चाचणी उपयुक्त ठरत नाही. तसेच मातीचा नमुना कोणत्या कारणाकरता घ्यायचा आहे हेही तेवढेच महत्त्वाचे असते. नमुना हा प्रातिनिधीकपरंतु संयुक्त असावा. मातीचा नमुना घेण्याकरता हॉपर नळी, नमुन्याची सळई, स्क्रू गिरमीट शिवाय शेतातच उपलब्ध होणारे फावडे, खुरपी किंवा थापी जरूरीप्रमाणे वापरावी. सर्वसाधारण नमुना घेण्याचे क्षेत्र हे दोन ते आठ एकर असावे व क्षेत्र खुप उंचसखल असेल तर आकारमान कमी करावे. जमिनीचा रंग, चढउतार, खोली खडकाळपणा, खोलगटपणा, पाणथळ जागा, क्षारयुक्त, विम्लयुक्त, निरायुक्त, जमिनीचा आणि पिकाचा प्रकार, जमीन व्यवस्थापन पूर्वी घेतलेली पिके यांचा विचार करून त्याचे विभाग पाडावेत व प्रत्येक विभागातून मातीचा स्वतंत्र नमुना घ्यावा. एकसारख्या दिसणार्या जमिनीतील चार ते १६ नमुने ३० सें. मी. खोलीपर्यंत घेवून त्याचा एक प्रातिनिधीक संयुक्त नमुना घ्यावा. क्षेत्र लहान असल्यास सुधारित शेती पद्धतीचा अवलंब करीत असल्यास आठ जागी नमुने घेवून त्याचा एक संयुक्त नमुना तयार करावा. फळबाग किंवा द्राक्षवेलीसाठी साधारणपणे ४० ते ५० सें. मी. खोलीपर्यंतचा नमुना घ्यावा. विम्लयुक्त जमिनीच्या अभ्यासासाठी ९० सें.मी. खोलीपर्यंत नमुना घ्यावा. सर्वसाधारणपणे हंगामाचा परिणाम कमीत कमी होत असताना म्हणजेच मध्य उन्हाळा ते पावसाळा सुरू होण्यापूर्वी मातीचा नमुना घ्यावा. हंमामापेक्षही पिकांची फेरपालटही तेवढीच महत्त्वाची असते. पिकाची काढणी झाल्यानंतर परंतु नांगरणीपूर्वी किंवा दुसरे पीक लावण्यापूर्वी माती परिक्षणासाठी नमुना घ्यावा. शेतात पीक उभे असल्यास दोन ओळीमधुन घ्यावा. शेतात रासायनीक खते टाकली असल्यास दोन ते अडीच महिन्यानंतर मातीचा नमुना घ्याव. जमीन हलकी असल्यास प्रत्येक वर्षी तसेच फेरपालटाचे पीक असल्यास प्रत्येक हंगामात माती परिक्षण करून घ्यावे.

शेतातील मोठ्या झाडाखालील, विहिरी जवळील, शेताच्या बांधावरील, वनस्पतीचे अवशेष असलेला, सेंद्रिय पदार्थ जाळलेली, कचरा टाकण्याच्या जागेतील, जनावरे बसण्याच्या जागेतील, रस्ता, कुंपन, इमारतीजवळील मातीचा नमुना घेऊ नये. तसेच रासायनिक खताच्या रिकाम्या पिशव्या नमुना भरण्यासाठी वापरू नयेत. फळबागांसाठी १०० सें. मी., कडधान्य व अन्नधान्य पिकास २० सें. मी. तर ऊस पिकासाठी ३० सें. मी. खोलीपर्यंतचा नमुना घ्यावा. नमुना घेताना शेत जमिनीच्या पृष्ठभागावरील काडीकचरा बाजूला सारून एका क्षेत्रातील १० ते १२ ठिकाणचे नमुने घ्यावेत. टखुरपे किंवा फावडे यांचा उपयोग करून इंग्रजीतील व्ही आकाराचा १५ ते २० सें. मी. खोल खड्डा खोदावा व तिरक्या छेदावरील साखारणपणे दोन ते तीन सें. मी. थर काढून घ्यावा. असे १० ते १५ नमुने एकत्र गोणपाटावर पसरावेत नंतर त्याचे समान चार भाग करून विरुद्ध बाजूचे दोन भाग निवडावेत आणि दोन भाग टाकून द्यावेत ही कृती साधारणपणे अर्धा किलो नमुना मिळेपर्यंत करावी. माती ओली असेल तर सावलीत वाळवून लाकडी खलबत्त्याने बारीक करून दोन मी. मी. चाळणीतून चाळून नंतर आपल्या नजीकच्या कृषी अधिकार्याकडे, भेट योजने मार्फत मृद चाचणी प्रयोगशाळेकडे किंवा खाजगी प्रयोगशाळेकडे पाठवावा.

# सामान्य नागरिकांची अडवणूक खपवून घेणार नाही आ.विजयसिंह पंडित

गेवराई। प्रतिनिधी

कोट्यावधी रुपये खर्च करूनही शहरातील नागरीकांना नियमित स्वच्छ पाणी का मिळत नाही ? असा सवाल उपस्थित करून आ.विजयसिंह पंडित यांनी व्यापारी गाळ्यांचे लिलाव, शहरातील अस्वच्छता, बंद पडलेले पथदिवे, मालमत्ता करात केलेली बेसुमार वाढ, अतिक्रमण धारकांच्या हक्काचे पीटीआर, रखडलेला हद्दवाढीचा प्रस्ताव, अनुकंपा तत्वावरील प्रलंबित नियुक्त्या यांसह विविध प्रश्नांवर नगर परिषद प्रशासनाला धारेवर धरले. सध्या पालिकेवर प्रशासक आहे, त्यामुळे कोणाच्याही राजकीय दबावाला बळी पडून सर्वसामान्यांची कामे अडवू नका, सामान्य नागरीकांची अडवणुक खपवून घेणार नाही असा इशारा आ.विजयसिंह पंडित यांनी दिला. नगर परिषदेच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी माजी आ.अमरसिंह पंडित, पालिकेचे प्रशासक विक्रम मांडूरगे यांच्यासह कर्मचारी, अधिकारी, पदाधिकारी व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी शुक्रवार, दि.७ फेब्रुवारी रोजी गेवराई नगर परिषदेची आढावा बैठक घेवून सर्वसामान्यांच्या मुलभूत समस्यांच्या निराकरणासाठी पुढाकार घेतला. या बैठकीत माजी आ.अमरसिंह पंडित यांनी शहरातील विकास कामांचा आढावा घेवून मार्गदर्शन केले. पाणी पुरवठा योजनेसाठी ६६.७८ कोटी रुपयांचा निधी खर्च झालेला असतानाही शहरातील नागरीकांना दररोज मुबलक स्वच्छ पाणी का मिळत नाही ? असा सवाल आ.पंडित यांनी उपस्थित केल्यामुळे आजवर विकासाचा गाजावाजा करणाऱ्या तथाकथीत कार्यसम्राटांच्या बोगसगिरीचा पडदाफाश झाला. नागरीकांना दररोज पाणीपुरवठा करण्यासाठी आवश्यक असलेले एक्सप्रेस फिडर आणि जलशुध्दीकरण यंत्रणा बसविण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना आ.पंडित यांनी पालिका प्रशासनाला दिल्या. या बैठकीत बचतगटाच्या महिलांना कर्ज रक्कमेचे धनादेश आ.पंडित यांच्याहस्ते वाटप करण्यात आले. संजयनगरसह अतिक्रमण भागातील नागरीकांवर आजवरच्या राज्यकर्त्यांनी केलेल्या अन्यायाचा पाढा उपस्थित तक्रारादांनी या बैठकीत वाचला. कोणताही राजकीय भेदभाव न करता नियमाप्रमाणे पात्र असतील त्यांना तात्काळ हक्काचा पीटीआर देण्याचे निर्देश देताना आ.पंडित यांनी या प्रक्रियेतील दलालांचा बंदोबस्त करण्याची सूचना त्यांनी केली. गुगल फॉर्ममध्ये नागरीकांकडून अर्ज आजपासून भरून घेणे सुरु करत असल्याचे आश्वासन यानिमित्ताने मुख्याधिकाऱ्यांनी दिले. पालिकेला नवीन अग्निशमन वाहन खरेदी करण्यासह अनुकंपा तत्वावरील नियुक्त्या, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची उपदाने या बाबतची कार्यवाही दोन दिवसांत करून छत्रपती शिवाजी महाराज उद्यान शिवजयंतीपूर्वी नागरीकांसाठी खुले करण्याचे निर्देशही आ.पंडित यांनी या बैठकीत दिले. नाट्यगृह आणि जलतरण तलाव कार्यान्वित करण्याची सूचना देवून शहरात महिलांसाठी सार्वजनिक ठिकाणी शौचालय सुविधा उपलब्ध करण्याचे निर्देश त्यांनी यानिमित्ताने दिले. गेवराई शहरात भुमिगत गटार योजना, मुख्य रस्त्यांचे नुतणीकरण व सुशोभिकरण करणे, शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरण करून त्यावर फुटपाथ, डिव्हायडर बसविणे, जुन्या पाण्याच्या टाकीच्या जागेवर भव्य शॉपिंग कॉम्पलेक्स उभारण्यासह शहरातील विकास कामे करण्यासाठी आपण तत्पर असल्याचे आ.विजयसिंह पंडित यांनी या बैठकीत सांगितले. या बैठकीच्या निमित्ताने गेवराई शहराबाबतचे व्हिजन त्यांनी लोकांसमोर मांडले. बैठकीत उपस्थित तक्रारदारांच्या तक्रारींचे त्यांनी तात्काळ निराकरण केले. घरकुलाचे अडकलेले हप्ते, दिव्यांगांना मिळणारे लाभ या बाबतच्याही सूचना त्यांनी यावेळी दिल्या. स्मशानभुमीत काम करणाऱ्या कामगाराचे मागील पाच वर्षांपासून वेतन थकीत असल्याप्रकरणी अतिशय कडक शब्दांत प्रशासनाला सूचना देत अशा कामगारांचे वेतन भविष्यात अडवू नका अशा सूचनाही त्यांनी बैठकीत दिल्या. नगर पालिका प्रशासनाच्यावतीने नवनिर्वाचित आमदार विजयसिंह पंडित यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. बैठकीला आ.विजयसिंह पंडित, माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात



### केएसपी विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारोप


बीड। प्रतिनिधी

शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी विद्यालयामधील दहावीच्या विद्यार्थ्यांन करिता निरोप समारोप साजरा करण्यात आला. इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा २१ फेब्रुवारी २०२५ पासुन सुरु होणार आहेत. प्रत्येकाच्या आयुष्यात अशी वेळ येते जेव्हा त्याला आपल्या प्रिय सोबतीनां सोडून जावे लागते आणि बऱ्याचदा अश्या वेळी निरोप समारंभाचे आयोजन देखील केले जाते. त्यामुळे शाळेतील इ. १० वी च्या विद्यार्थ्यांचे आयुष्यातील शालेय जीवन संपन्न होणार आहे. त्यांना निरोप देण्याकरिता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात मुलांनी आपल्या शालेय जीवनातील अनुभव आपल्या मनोगतातुन व्यक्त केले. मनोगत व्यक्त करतांना काही मुले भाऊक झाली. शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील आयुष्याकरिता शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास श्री. ऋषिकेशजी शेळके साहेब, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी मुलांना पुढील शैक्षणिक जीवनामध्ये कोणतेही पाऊल उचलताना कोणते क्षेत्र आपणासाठी योग्य आहे, निर्णय कसे घ्यावे या विषयी मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमास संस्थाध्यक्षा सौ.अंजलीताई शेळके, तसेच शाळेतील प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक शिक्षिकेत्तर कर्मचारी उपस्थितीत होते.

### नजान यांच्या पाचरट कादंबरीचे आज पाटोदा येथे प्रकाशन

पिंपळवंडी। प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री.स्वामी अमृत भारती विद्यालयाचे शिक्षक श्री. अशोक नजान यांनी लिहिलेल्या ''पाचरट'' या कादंबरीचे आज दि.०९/०२/२०२५ रविवार रोजी सकाळी ८ वा. पी. व्ही. पी. महाविद्यालय पाटोदा या ठिकाणी मान्यवरांच्या उपस्थितीत व शुभहस्ते प्रकाशन होत आहे. या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन श्री नजान सर यांनी केले आहे. संपूर्ण पश्चिम महाराष्ट्राला ऊसतोड मजूर पुरविणाऱ्या बीड जिल्ह्यातील दुष्काळ,एकही लघु- मध्यम व मोठा उद्योग नसलेला जिल्हा अशी ओळख, भूमिहीन,अल्पभूधारक आणि कोरडवाहू जमिनी इत्यादीमुळे निर्माण झालेले दारिद्र्य,व्यसनाधीनता,हुंडा पद्धती,स्त्रीभ्रूणहत्याचे केंद्र व विषम लिंगगुणोत्तर यांचे अतिशय वास्तव मांडणारी कादंबरी म्हणून या कादंबरीचे वाचक निश्चित स्वागत करतील असा विश्वास नजान सर यांनी व्यक्त केला आहे.




### अविराज पवार यांच्या वतीने शालेय साहित्याचे वाटप

पिंपळवंडी । प्रतिनिधी

आष्टी-पाटोदा-शिरूर मतदार संघाचे आ.सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त पाटोदा तालुक्यातील अंमळनेर येथील गहिनीनाथ वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना पत्रकार अविराज पवार यांच्या वतीने शालेय शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.यावेळी ॲड.एन.एन. साबळे,पत्रकार चंद्रकांत पवार, अभिराज पवार यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.यावेळी पत्रकार बबनराव उकांडे,भाऊसाहेब पवार,अक्षय बेद्रे आदीसह भारत पवार तसेच वस्तीगृहाचे कदम उपस्थित होते.

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या बीड जिल्हाध्यक्षपदी बालाजी तोंडे, शेख रिजवान

### जिल्हा कार्याध्यक्षपदी सोमनाथ धांडे यांची निवड

बीड। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी बालाजी तोंडे, शेख रिजवान तर कार्याध्यक्षपदी सोमनाथ धांडे यांच्या निवड करण्यात आली. असल्याची घोषणा राज्य समन्वयक संतोष मानुरकर यांनी केली आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईची बीड जिल्हा कार्यकारिणी प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे, यांच्या मान्यतेने राज्य समन्वयक संतोष मानुरकर यांनी घोषित केली असुन जिल्हा कार्यकारिणीमध्ये जिल्हा उपाध्यक्षपदी दत्ता आजबे, आप्पासाहेब महानोर, प्रशांत लहुरीकर सचिवपदी राहुल गायकवाड, सहसचिव नितीन मुंडे, सदस्यपदी गणेश जाधव, उदय नागरगोजे, रामेश्वर जाधव, बंडु दुबाले, मनोज गव्हाणे, निलेश येलगिरे, बाळासाहेब वरकड, निलेश वाघमोडे यांची निवड करण्यात आली. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई ही पत्रकारांच्या विविध प्रश्नांसाठी लढणारी, त्यांना त्यांचे हक्क मिळवून देणारी संघटना आहे.



पत्रकारांच्या प्रश्नांसाठी वाचा फोडण्यासाठी प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली दीक्षाभूमी ते मंत्रालयात पत्रकार संवाद यात्रा काढून पत्रकारांचे प्रश्न प्रभावपणे सरकार दरबारी मांडले त्यातून पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र दोन महामंडळाचे सरकारने घोषणा केली. संघटनेने सामाजिक आणि समाजाभिमुख उपक्रमामध्ये सातत्याने मोठे योगदान दिले आहे. नव्याने नियुक्त केलेल्या बीड जिल्हा कार्यकारिणीतील पदाधिकारी देखील पत्रकारांच्या प्रश्नाबाबत सजग राहून सामाजिक उपक्रमांना बळ देतील असा विश्वास प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी व्यक्त केला आहे.तर राज्य समन्वयक संतोष मानुरकर यांनी नवीन पदाधिकार्यांना शुभेच्छा देत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई ही केवळ संघटना नाही तर पत्रकारांच्या न्याय हक्काची चळवळ आहे. लहान-मोठ्या उपक्रमाच्या माध्यमातून पत्रकार संघ सातत्याने चांगले उपक्रम राबवत राहील असे सांगितले. प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे, राज्य समन्वयक संतोष मानुरकर यांनी नवनियुक्त पदाधिकार्यांचे अभिनंदन करुन त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्याच्या प्रदेश सचिवपदी गणेश जगदाळे

मुंबई प्रतिनिधी। प्रतिनिधी

लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्याच्या प्रदेश सचिवपदी गणेश जगदाळे यांची निवड संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य यांनी नाशिक येथील बैठकीत केली. गणेश जगदाळे यांनी अनेक दैनिकांसह, पत्रकार संघटनेत कार्य केले असून ते सध्या सकाळ समूहात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी असलेल्या यिन व्यासपीठाचे उत्तर महाराष्ट्र आणि मुंबई विभाग प्रमुख आहेत, तरुणाईला योग्य दिशा देणे आणि मराठी तरुणांना उद्योग क्षेत्रात उभे करण्यासाठी मोठे योगदान आहे. या कार्याची दाखल घेऊन त्यांची प्रदेश सचिव पदी निवड करण्यात आली. यावेळी सिनेअभिनेता पंकज ठाकूर, वाल्मिक म्हपसे, सिद्धदोधन खंदारे, धर्मेंद्र कदम, जयश्री बस्ते, गायत्री लचके, सुमेध साठे यांच्या हस्ते निवडपत्र देण्यात आले.



यावेळी नवनिर्वाचित प्रदेश सचिव गणेश जगदाळे म्हणाले की, लोकशाही पत्रकार संघाच्या माध्यमातून पत्रकारांचा सर्वांगीण विकास हा एकच ध्यास घेऊन आणि समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देणारी महाराष्ट्र राज्यातील एकमेव संघटना अशी ओळख निर्माण केली आहे. या बैठकीत संस्थापक अध्यक्ष म्हणाले की,लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य पत्रकारांच्याआणि महाराष्ट्र मधील तमाम सर्व सामान्य नागरिकांचे देखील विविध मागण्या शासन दरबारी मांडून मंजूर करून घेणार आहेत. विविध समित्या स्थापन करून महाराष्ट्र राज्यात तालुक्यात सर्वत्र विकास केला जाईल. विविध कार्यक्रम साजरे केले जातील. एक वेगळा ठसा उमटवण्याचा लोकशाही पत्रकार संघाच्या माध्यमातून प्रयत्न केला जाईल. गणेश जगदाळे यांची प्रदेश सचिव पदी निवड केल्या बद्दल सत्कार करून संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, राष्ट्रीय अध्यक्ष माणिक वाघमारे, राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप जाधव, राष्ट्रीय कार्याध्यक्ष मंगला वाघ, राष्ट्रीय निरीक्षक डॉ. भोळे, मुंबई प्रदेश अध्यक्ष मंत्रालय कामकाज दत्तात्रय हंडीबाग, राष्ट्रीय सचिव छाया वैद्य, राष्ट्रीय अध्यक्ष महिला बचत गट, उद्योग विकास समिती सुनंदा केदार यांच्या मार्गदर्शनानुसार लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय अध्यक्ष - माणिक वाघमारे, राष्ट्रीय उपाध्यक्ष - संदीप जाधव,राष्ट्रीय कार्याध्यक्ष-मंगला वाघ, प्रदेश अध्यक्ष प्रताप साळुंके पाटील, प्रदेश उपाध्यक्ष रामदास तपसे, वसीम आजाद, साजेद सय्यद, बालाजी अडियाल,प्रदेश कार्याध्यक्ष -अयुब पठाण , प्रदेश कार्याध्यक्ष महिला आघाडी आयेशा खान, टीव्ही -युट्युब चॅनल विकास समितीचे प्रदेश अध्यक्ष महेबूब शेख, मराठवाडा सचिव अनिस कुरेशी, प्रदेश अध्यक्ष महिला आघाडी-निलोफर शेख, प्रदेश उपाध्यक्ष संध्या भोसले, प्रदेश उपाध्यक्ष महिला बचत गट उद्योग विकास समिती सारिका शेवाळे, प्रदेश अध्यक्ष महिला अन्याय अत्याचार निर्मूलन विकास समिती श्रद्धा कंडूडे, प्रदेश उपाध्यक्ष पोलीस मित्र विकास समिती राणी झिंझुर्डे पाटील, प्रदेश सचिव राणीताई शेख, बीड जिल्हा अध्यक्ष शेख बिलाल, आत्माराम वाव्हाळ यांनी पुढील कार्यास मनःपूर्वक खूप खूप शुभेच्छा दिल्या आहेत.

## माता रमाई यांच्या संघर्षमय जीवनातून सर्वांनी प्रेरणा घ्यावी : डॉ.सिरसाट

बीड। प्रतिनिधी

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षमय जीवनात त्यांची सावली बनलेल्या माता रमाई आंबेडकर यांचे संपूर्ण आयुष्य हे दुःख, त्याग, समर्पण आणि करुणेने भरलेलं होतं. त्यांनी आयुष्याचा खडतर प्रवास करत अखेरच्या क्षणापर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना समर्थ साथ दिली. त्यांचा त्याग आणि संघर्ष प्रेरणादायी आणि आदर्शवत असून त्यांच्या संघर्षमय जीवनातून आपण प्रेरणा घेण्याची गरज असल्याचे प्रतिपादन बीड येथील बलभीम महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रो.डॉ.मनोहर सिरसाट यांनी व्यक्त केले.देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या वतीने माता रमाई आंबेडकर यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त शुक्रवार ता.७ जानेवारी रोजी तुलसी महाविद्यालयात विशेष व्याख्यान समारंभाचे आयोजन करण्यात आले होते,या प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डी.जी.निकाळजे होते तर तुलसी फॅशन कॉलेजच्या प्रा.अश्विनी बेद्रे, तुलसी नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य मिलिंद वडमारे,तुलसी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रकाश ढोकणे यांची प्रमुख उपस्थिती होती.पुढे बोलतांना प्रोफेसर डॉ.मनोहर सिरसाट म्हणाले की, माता रमाई यांच्या व्यक्तिमत्त्वाची उंची खूप मोठी आहे. त्यांनी बाबासाहेबांच्या सदैव सोबत राहून त्यांच्या कार्यात खंबीर साथ दिल्यानेच बाबासाहेब हे आपले कर्तृत्व सिद्ध करू शकले, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य प्रा.डी.जी.निकाळजे यांनी माता रमाई यांच्या जीवनातील विविध पैलूंसंबंधी आपले विचार व्यक्त केले आणि माता रमाई जयंतीच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.योगिता लांडगे तर आभार प्रा.शिल्पा बोराडे यांनी मानले. यावेळी तुलसी शैक्षणिक समूहातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## सकारात्मक विचारांमुळेच यश प्राप्ती होते -प्राचार्य हांगे

पाटोदा। प्रतिनिधी

जीवनात योग्य दिशेने व नेहमी सकारात्मक विचार करून प्रयत्न केल्यास निश्चित यशप्राप्ती होते असे प्रतिपादन प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ७ फेब्रुवारी रोजी आयोजित बारावी वर्गाच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभात ते अध्यक्षीय समारोपात बोलत होते. प्रमुख अतिथी म्हणून पाटोदा नगरपंचायतचे माजी सदस्य व महाविद्यालय विकास समिती सदस्य संदीप जाधव उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून ह.भ.प. प्रियंकाताई अडसूळ उपस्थित होत्या. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. सतिश माऊलगे, कमवि उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, तानाजी अडसूळ उपस्थित होते. कार्यक्रमात सर्वप्रथम संस्थेच्या संस्थापिका कै. सौ. केशरबाई क्षीरसागर उर्फ काकूंच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाला अर्पण अतिथिंच्या हस्ते संपन्न झाले.



त्यानंतर विद्यार्थ्यांमधून रोहीत नागरगोजे, वैभव सस्ते, आरिबा सय्यद, अंकिता भवर, जागृती गायकवाड, सुवर्णा क्षीरसागर या विद्यार्थ्यांनी मनोगतातून भावना व्यक्त केल्या. पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, डॉ. सतिश माऊलगे यांनीही विद्यार्थ्यांना मनोगतातून प्रेरणादायी संदेश दिले. प्रमुख अतिथी संदीप जाधव यांनी विद्यार्थ्यांना व्यसनांपासून अलिप्त राहण्याचे आवाहन केले. ह.भ.प. प्रियंकाताई अडसूळ यांनी उत्तम दाखला देत जीवनात कष्ट घेतल्याशिवाय यश मिळत नाही असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विठ्ठल शिंदे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. शेख इरफान यांनी केले. आभारप्रदर्शन प्रा. पिंटू रोडे यांनी केले. निरोप समारंभास विद्यार्थी व प्राध्यापक बहुसंख्येने उपस्थित होते.

## आ.संदीप क्षीरसागरांकडून बंधाराकम पुल जागेची पाहणी

बीड। प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी मतदार संघातील विकास कामांचा समतोल कायम ठेवला आहे मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्यक्षात सुरू झालेली विकासकामे गतीने पुढे सरकावीत यासाठी स्वतः उभा राहून आमदार संदीप भैया लक्ष देत आहेत. शनिवारी (दि.८) सकाळी बीड शहरातील बिंदुसरा नदीपात्रात बंधारा कम पुल होत असलेल्या जागेची त्यांनी पाहणी केली. तसेच तेलगाव नाका येथे पाण्याच्या नविन पाईपलाईन योजनेचा शुभारंभ आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आला. बीड शहरातील बिंदुसरा नदीपात्रात बंधारा कम पुल होत आहे.या जागेची आ.संदीप क्षीरसागरांकडून पाहणी करण्यात आली. लवकरच या कामाला प्रत्यक्ष सुरूवात देखील होणार आहे. काम सुरू होण्यासाठी आवश्यक असलेल्या तपासणी व चाचण्या घेण्याचे काम सुरू आहे अशी माहिती यावेळी त्यांनी दिली.




बीड शहरातील तेलगाव नाका येथे पाण्याची नविन पाईपलाईन योजनेचा शुभारंभ आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी त्यांनी परिसरात सूरु असलेल्या रस्ता कामांची पाहणी केली. याबरोबरच बीड शहरातील प्रभाग क्र.२२ मधील कै.शिवाजी धांडे नगर भागातील मुख्य नाल्याची पाहणी करून नाल्याचे काम तातडीने सुरू करण्याबाबत आ.संदीप भैय्यानी संबंधित यंत्रणेस निर्देश दिले. तसेच या परिसरात सुरू असलेल्या विविध विकासकामांची पाहणी देखील केली. यावेळी उपस्थित नागरिकांशी संवाद साधला. सध्या बीड शहरातील शाहूनगरमधील आदर्श नगर भागात सिमेंट रस्ता कामासह विकासकामांची पाहणी केली. यावेळी उपस्थित नागरिकांशी विविध विषयांवर आ.संदीप क्षीरसागर यांनी चर्चा केली. बीड शहरासह मतदारसंघातील विकास कामांचा वेग यापुढेही असाच कायम ठेवला जाईल अशी ग्वाही त्यांनी याप्रसंगी दिली.

# अखेर ७ महिन्यानंतर सार्वजनिक स्वच्छतागृहाचे टाळे उघडले

## सामाजिक कार्यकर्त्यांच्या मागणीची जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरातांकडून दखल

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्हा रुग्णालयाच्या आवारात असलेल्या सार्वजनिक स्वच्छतागृहाची देखभाल व स्वच्छता करण्यासाठी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी नकार दिला होता.प्रशासन देखील हे काम कर्मचाऱ्यांना करायला लावण्यास धजावत नव्हते त्यामुळे मागील ७ महिन्यांपासून स्वच्छतागृह कुलुपबंद होते. परीणामी जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी आंतररूग्ण विभागात दाखल रूग्णांना भेटण्यासाठी येणारे नातेवाईक तसेच बाह्यरुग्ण विभागात तपासणी व उपचारासाठी आलेले आणि अपघाती रूग्णांसोबत येणारे नातेवाईक तसेच सोनोग्राफी करण्यासाठी ताटकळत असलेल्या गर्भवती महिला असा दररोज हजारो लोकांचा रूग्णालयात राबता असतो.





मात्र जिल्हा रुग्णालय आवारातील सार्वजनिक स्वच्छतागृहाला ७ महिन्यांपासून टाळे असल्याने नैसर्गिक विधीसाठी जायचे कोठे ? असा प्रश्न पडला होता त्यामुळे शारीरिक आणि मानसिक कुचंबणा होत होती. त्यामुळे नागरीकांची गैरसोय दूर करण्यासाठी तातडीने सार्वजनिक स्वच्छतागृहे खुले करण्यात यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर, रामनाथ खोड,सुदाम तांदळे,मुबीन शेख,शिवशर्मा शेलार, मुस्ताक शेख यांनी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांना लेखी निवेदनाद्वारे केली होती.

अखेर याची दखल घेऊन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांच्या आदेशाने जिल्हा रुग्णालयातील सार्वजनिक स्वच्छतागृहाचे टाळे उघडले असुन येथीलच कर्मचाऱ्यांना स्वच्छतेचे काम देण्यात आले आहे.

यामुळे नागरीकांची विशेषतः महिलांची होणारी हेळसांड थांबली आहे.

स्वच्छतागृह सुरू करण्यात आले असून लवकरच नविन माता व बाल रुग्णालयातील स्वच्छतागृहे वापरात येतील जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात जिल्हा रुग्णालय आवारातील सार्वजनिक स्वच्छतागृह सुरू करण्यात आले आहे.

आता माता व बालसंगोपन रूग्णालयाच्या नव्याने बांधलेल्या इमारतींमध्ये खालच्या मजल्यावर मोठे स्वच्छतागृह बांधण्यात आलेले आहे. लवकरच त्याचाही वापर सुरू करण्यात येईल असे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांनी सांगितले.

राज्य लोकतंत्र
रविवार, दि.९ फेब्रुवारी २०२५ | ६

# परळीच्या युवकाची दुबईत बुलेट रेल्वेच्या ऑपरेशन मॅनेजरपदी निवड

## बीड जिल्ह्याच्या शिरपेचात अभियंता राजू जगतकर यांच्यामुळे आणखी एक मानाचा तुरा

परळी / बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा म्हटलं की दुष्काळी भाग कधी ओला तर कधीच कोरडा दुष्काळ या बीड जिल्ह्याने नेहमीच पाहिला आहे. यात शेतकऱ्यांची पोरं आता शेती नको शिक्षण हवं याच दृष्टिकोनातून शिक्षणाच्या पाठी लागले आहेत मात्र शिक्षण करूनही नोकरीचा किंवा नोकरी मिळण्याच्या संधीची नेहमीच वाट बघतात मात्र कधी नोकरीचा विषय जरी आला तर भरमसाठ पैसा द्यावा लागतो. असे एक गणित सध्या बीड जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवकांच्या उराशी गाठ बांधली असल्याचे पाहायला मिळतात, मात्र परळीतील एका सर्वसामान्य कुटुंबातील युवकांनी या सगळ्या गोष्टीचा कोणताही विचार न करता आपल्या शिक्षणाला एक ध्येय आणि एक यशाची पायरी म्हणून शिक्षण घेत राहिला आणि तब्बल बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातुन थेट दुबईपर्यंतचा प्रवासस्थाने आपल्या संघर्षातून पार पडला परळीचे भूमिपुत्र आणि इंजिनीयर राजू श्रावणराव जगतकर हे आज महाराष्ट्रात नव्हे भारतात नव्हे तर थेट आता नोकरी करणार आहेत ते दुबईमध्ये दुबईमध्ये जाण्याआधी त्यांनी दिल्ली व मुंबई येथे वेगवेगळ्या पदावर मेट्रो रेल्वेचे काम पाहिले आहे. याच त्यांच्या अनुभवी आणि कौशल्य पूर्व नेतृत्वाला जोपासून ठेवलं आणि याचीच संधी आता थेट त्यांना दुबई येथे मिळाली आहे दुबई येथे ते आता बुलेट रेल्वेच्या ऑपरेशन मॅनेजर पदी त्यांची दुबईच्या सरकारने निवड केली आहे.यामुळे आता बीड जिल्ह्याच्या शिरपेचावर मानाचा आणखी एक तुरा खवल्या गेला आहे. इंजि राजू जगतकरांना ही संधी मिळाल्यानंतर परळी तालुक्यात मित्रपरिवार आणि नातेवाईकांनी जणू काही दिवाळीत साजरी केली आहे. कारण नेहमीच बीड जिल्हा हा कोणत्या ना कोणत्या वादात महाराष्ट्राने पाहिला मात्र याच बीड जिल्ह्यातील अनेक युवकांनी बीड जिल्ह्याच्या शिरपेचावर अनेक मानाचे तुरे खवले आहेत हे देखील उल्लेखनीय आहे. यामध्ये इंजि.राजू जगतकर हे बीड जिल्ह्यातील कौशल्यपूर्ण असलेले संपादक बालाजी जगतकर यांचे छोटे बंधू आहेत. यामध्ये मोठ्या बंधू व आई वडील यांचे आशीर्वाद आणि त्यांच्या मार्गदर्शनाने राजूने आपलं ध्येय गाठलंच नाही तर परळी, बीड जिल्हा असो किंवा महाराष्ट्र किंवा देश असो या देशावर देखील आपण या देशात राहून दुसऱ्या देशात आपलं कौशल्य दाखवू शकतो हे दाखवून दिलं आहे. यासाठी इंजि राजू जगतकर यांचं परळी व बीड जिल्ह्यातून कौतुक होत आहे.



### निरोपाचा सत्कार

परळी येथे इंजि. राजू श्रावण जगतकर व त्यांच्या पत्नी मुंबई मेट्रो रेल्वेस्टेशन मास्तर अपर्णा राजू जगतकर यांचा परळीतील निवासस्थानी शाल, श्रीफळ, पुष्पहार, पुष्पगुच्छ देऊन परळी समाचारचे संपादक आत्मलिंग शेटे,राजेश साखरे सहशिक्षक वैद्यनाथ विद्यालय, रामकिशन सावंत, प्रमोद सावंत, श्रावणराव जगतकर, कासुबाई जगतकर,बालाजी जगतकर, केशरबाई गायकवाड, वंदना जंगले, सिद्धार्थ जगतकर, संजय जोगदंड,राज जगतकर, रावसाहेब जगतकर, ब्रिजेश जगतकर, मुकुंद जगतकर, प्रताप समुद्रसवळे, सिद्धार्थ जगतकर, मिलिंद विद्यालयातील सर्व वर्गमित्र आदी दिसत आहेत.

# चौसाळा विद्युत महामंडळाचा गैरकारभार

## खंडित वीज पुरवठ्यामुळे पाणीपुरवठ्यात खोडा; नागरिकांना मिळेना पाणी

चौसाळा । प्रतिनिधी

चौसाळा येथील विद्युत मंडळच्या गैरकारभाराला नागरिक वैतागले असून वारंवार निवेदन देऊंन हि मंडळाला काहीच फरक पडत नाही चौसाळा येथील ग्रामपंचायतच्या पाणीपुरवठ्याच्या गोलांगरी येथील विहिरीच्या मालकीची डीपीवर आकडे टाकून विद्युत पुरवठा घेतला जात आहे त्यामुळे चौसाळाच्या स्वतंत्र विद्युत डीपी असताना दुसरे कनेक्शन असल्याने पाणीपुरवठ्यास अडथळा निर्माण होत आहे परिणामी नागरिकांना पाणी मिळत नाही सदरील प्रकरणी माहिती अशी की चौसाळा येथील नागरिकांना नव्याने गावठाणच्याा स्वतंत्र फिटरवरून विधुत पुरवठा होत असताना चौसाळ्यातील अनेक डीपी वरून शेतकऱ्यांच्या पिकांना विद्युत पंपांना जवळच्या डीपी मधून अवैधरित्या आकडे टाकून कर्मचाऱ्यांच्या संगनमताने विद्युत पुरवठा घेत आहेत सदर या गैरकारभाराकडे अभियंता शिंदे। यांच्या सह चौसाळा परिसरातीलील लाईनमनची यांचे कमालीचे दुर्लक्ष होत असल्याने त्यामुळे चौसाळा परिसरात वारंवार विद्युत पुरवठा खंडित व कमी दाबातून होत आहे तरी संबंधित विद्युत मंडळाच्याअधिकाऱ्याने या प्रकरणे आकडेबदराच्या व अभियंताच्या विरुद्धतातडीने कारवाई करावी करून चौसाळा नळ योजनेला विद्युत पुरवठा सुरळीत करावा अन्यथा चौसाळा येथिल नागरिकांना आताताई मार्गाने रस्त्यावर उतरावे लागेल असा इशारा व मांगनी चौसाळा येथील ज्येष्ठ नागरिक व कार्यकर्ते श्री बाबुशेठ लोढा यांनी केली आहे.

# सुरूडी आश्रमशाळेमध्ये संवाद चिमुकल्यांशी अभियानांतर्गत अधिकारी मुक्कामी

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील शासकीय माध्यमिक आश्रमशाळा सुरुडी ता आष्टी जि बीड या ठिकाणी प्रकल्प अधिकारी श्रीमती चेतना मोरे मॅडम यांच्या मार्गदर्शनाने संवाद चिमुकल्यांशी या अभियानांतर्गत प्रकल्प कार्यालयाचे आदरणीय विनोदकुमार सांगळे साहेब सहाय्यक प्रकल्प अधिकारी शिक्षण, यांनी सुरुडी आश्रम शाळेला मुक्कामी भेट दिली.



महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग तर्फे आदिवासी विकास मंत्री माननीय डॉ. अशोक उईके साहेब यांच्या महत्त्वकांक्षी संकल्पनेतून संवाद चिमुकल्यांशी या अभियानांतर्गत महाराष्ट्रातील ४९७ शासकीय आदिवासी आश्रमशाळांमध्ये मंत्री, लोकप्रतिनिधी, सर्व विभागातील अधिकारी यांनी भेट देणे व एक दिवस विद्यार्थ्यांच्या सोबत त्यांच्या सोयी सोयीसुविधाविषयी चर्चा करून अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणामध्ये विद्यार्थ्यांशी संवाद साधने व मुक्कामी राहून त्यांच्या अडचणी जाणून घेणे हे अभियान राबवण्यात आले. एकात्मिक आदिवासी ◀◀ पान ३ वर

# ॲड.शिवाजी कांबळे यांची नोटरीपदी नियुक्ती

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील प्रख्यात विधीज्ञ ॲड.शिवाजी देवाजी कांबळे यांची भारत सरकारच्या वतीने नोटरीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. भारत सरकारच्या विधी व न्याय मंत्रालयाच्या वतीने त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याबद्दल सर्वस्तरांतून ॲड.कांबळे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



केंद्र सरकारच्या विधी व न्याय विभागातर्फे नोटरीपदी निवड करण्यात करण्यात आलेल्या यादीमध्ये ॲड.शिवाजी देवाजी कांबळे यांच्या नांवाचा समावेश आहे. ॲड.कांबळे यांना मागील १८ वर्षांपासून वकिली व्यवसायाचा अनुभव आहे. तसेच ते सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असतात. त्यांच्या या निवडीबद्दल सहकारी मित्र, परिवार यासह विविध संस्थांचे तसेच संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन ◀◀ पान ३ वर



बीड : शनिवारी बीड चे पोलीस अधीक्षक नवनीत कावत व अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या समक्ष ट्रॅव्हल्स मालक यांची बैठक घेण्यात आली. त्यामध्ये ट्रॅव्हल्स मध्ये अवैध गुटखा, ड्रग्स गांजा तसेच अवैध कुरिअर अशी वाहतूक कोणी करणार नाही तसेच वाहतुकीवर लक्ष देतील अशा प्रकारच्या सूचना दिल्या. तसेच चालक दारू पिऊन ट्रॅव्हल्स चालवणार नाहीत याची खात्री करणे बाबत मालकांना सूचना दिल्या. या बैठकी करिता वाहतूक शाखेचे सपोनी सुभाष सानप व ट्रॅव्हल्स चालक-मालक होते.

# सह्याद्री प्रतिष्ठाणच्या वतीने शिवजन्मोत्सव

## रक्तदान शिबीरासह चित्तथरारक कवायती

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील सह्याद्री प्रतिष्ठाणच्या वतीने शहरात दि. १९ फेब्रुवारी रोजी शिवजन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव, सकाळी ११.०० वाजता रक्तदान शिबीर, हॅंगींग डि. जे. तर प्रथमच अमृतसर पंजाब येथील वीर खालसा ग्रुपचे चित्तथरारक कवायतींचे सादरीकरण होणार असुन याचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन मा. सभापती जयसिंह सोळंके यांच्या हस्ते तर अध्यक्षस्थांनी भाजपा नेते ज्ञानेश्वर मेंडके तर सभापती जयदत्त नरवडे, संभाजी शेजुळ, शिवाजी रांजवण, चंद्रकांत शेजुळ, रोहन घाडगे, सुशिल सोळंके, नासेर पठाण, खलील पटेल, अच्युत लाटे, राहुल लंगडे, विजय शिंदे, सुशांत पौळ, भागवत भोसले, बाळासाहेब सोळंके, सुशिल डक, सहाय्यक पोलिस अधिक्षक डॉ. बी. धिरजकुमार, उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले, तहसिलदार संतोष रूईकर, मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण, डॉ. सुरेश साबळे, पोलिस निरीक्षक राहुल सुर्यतळ, बालक कोळी, डॉ. श्रेयस देशपांडे, डॉ. ज्ञानेश्वर गिलबीले, डॉ. अमोल परतुरकर यांचेसह अनेक मान्यवरांची उपस्थिती असणार आहे. या आगळ्या - वेगळ्या व शहरात प्रथमच अमृतसर पंजाब येथील वीर खालसा ग्रुपचे चित्तथरारक कवायती होणार असुन याचा लाभ घ्यावा असे आवाहन सह्याद्री प्रतिष्ठाणचे अध्यक्ष नवनाथ गायकवाड, कोषाध्यक्ष नारायण शेजुळ, सचिव प्रशांत शेटे, कार्याध्यक्ष दिलीप झगडे व सह्याद्री प्रतिष्ठाणच्या वतीने करण्यात आले आहे.

# अंगणवाडीतील खिचडी खाल्याने अकरा बालकांना विषबाधा

## बालकांना मळमळ व उलटीचा होतोय त्रास

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील टाकरवन जवळ असलेल्या फुलसिंग नगर तांडा येथील अंगणवाडीत दि ०८ फेब्रुवारी शनिवार रोजी सकाळी ११:०० वाजण्याच्या सुमारास खिचडी खाल्ल्याने ११ बालकांना विषबाधा झाल्याची घटना घडली.या बालकांवर माजलगाव येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात येत असून या सर्व बालकांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे.





टाकरवन जवळ असलेल्या फुलसिंग नगर तांडा या ठिकाणी असलेल्या अंगणवाडीत २९ बालकं असून त्यापैकी ७ बालकं दि ०८ फेब्रुवारी शनिवार रोजी आंगणवाडीत उपस्थित होते.या अंगणवाडीतील मुलांबरोबर शेजारी असलेल्या जिल्हा परिषद शाळेतील काही विद्यार्थी या ठिकाणी खिचडी खाण्यासाठी आले होते.खिचडी खाऊन ही बालके आपापल्या घरी गेली.त्यानंतर दुपारी १:०० वाजेच्या सुमारास अंगणवाडीतील ७ व ४ जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या बालकांना अचानक मळमळ व उलटीचा त्रास सुरू झाला. अंगणवाडी सेविका कविता राठोड यांनी सरपंच सुनील तौर व उपसरपंच दयानंद बोबडे यांना याची माहिती दिली. तालुका आरोग्य अधिकारी डॉ.मधुकर घुबडे यांना माहिती मिळताच त्यांनी तात्काळ रुग्णवाहिका पाठवून बालकांना ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. सर्वांवर उपचार करण्यात आले असून सर्व बालकांची प्रकृती स्थिर असल्याचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ.मधुकर घुबडे यांनी सांगितले.

# शिरूरच्या चार युवकांची पोलीस दलात निवड



## सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांच्याकडून सत्कार

शिरूर कासार । प्रतिनिधी

नुकत्याच जाहीर पोलीस दलातील निवड यादीमधे शिरूर कासार तालुक्यातील ग्रामीण भागातुन चार यूवकांची महाराष्ट्र पोलीस निवड झाली असून त्यांचा सिंदफणा अर्बनच्या वतीने सस्थापक आजीनाथ गवळी यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्र पोलीस दलामधील निवड यादी नुकतीच जाहीर झाली असून यामधे चि.अभिजित काकासाहेब जेधे-हिंगेवाडी,कृष्णकांत भास्कर केद्दार-वारणी,विनोद खेडकर-पिंपळनेर,श्रीकांत नागरगोजे-जांब या चारही युवकांनी जिद्द व चिकाटीच्या जोरावर यश मिळवुन आपल्या आई-वडीलांचे स्वप्न पुर्ण केले.या यशाबद्दल त्यांचा ◀◀ पान ३ वर

# कौटुंबिक संस्काराची शिदोरी माता रमाईकडून शिकावी-प्रा.संजय बागुल

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील सावरगाव येथे त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि भव्य प्रमाणात साजरी करण्यात आली. गावातील सर्व भीमसैनिक, माता-भगिनी आणि युवक-युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावकऱ्यांच्या एकजुटीमुळे आणि उत्कृष्ट संयोजनामुळे हा कार्यक्रम अत्यंत प्रेरणादायी ठरला.



त्यागमूर्ती माता रमाई जयंती उत्साहात साजरी
सावरगावमध्ये भीमसैनिकांची भव्य उपस्थिती

गावातील सर्व भीमसैनिकांनी एकत्र येऊन हा जयंती उत्सव मोठ्या जोशात आणि अनुशासनात पार पाडला. कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोक मगर, प्रमुख पाहुणे अश्विन टाकणखार, केतन प्रधान, दीपक गायकवाड आणि साई ग्राफिक्सचे मालक अशोक कांबळे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ◀◀ पान ३ वर

# वंजारी समाज वार्षिक अंकाचे मुंडे भगिनींच्या हस्ते प्रकाशन

बीड । प्रतिनिधी

दरवर्षी वंजारी समाज वार्षिक अंक प्रकाशित केला जातो. या वर्षीच्या सहाव्या अंकाचे प्रकाशन मुंडे भगिनींच्या हस्ते करण्यात आले.



शुक्रवार दि.७ फेब्रुवारी २०२५ रोजी बीड येथील शासकीय विश्रामगृहावर वंजारी समाज वार्षिक अंकाचे प्रकाशन करताना राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे दिसत आहेत तर दुसऱ्या छायाचित्रात दिनांक ६ फेब्रुवारी २०२५ रोजी दैनिक पार्श्वभूमी कार्यालयात माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे या अंकाचे प्रकाशन करताना दिसत आहेत. यावेळ वंजारी समाज वार्षिक अंकाचे कार्यकारी संपादक डॉ. संजय तांदळे, पत्रकार श्री आत्माराम वाव्हळ, भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष श्री प्रदीप बांगर, दै. पार्श्वभूमी चे संपादक श्री गंमत भंडारी,बाजीराव ढाकणे , दिनकर चाटे आदी दिसत आहेत.

# वसंतदादा पाटील महाविद्यालयातील बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ

पाटोदा । प्रतिनिधी

जीवनात योग्य दिशेने व नेहमी सकारात्मक विचार करून प्रयत्न केल्यास निश्चित यशप्राप्ती होते असे प्रतिपादन प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ७ फेब्रुवारी रोजी आयोजित बारावी वर्गाच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभात ते अध्यक्षीय समारोपात बोलत होते. प्रमुख अतिथी म्हणून पाटोदा नगरपंचायतचे माजी सदस्य व महाविद्यालय विकास समिती सदस्य संदीप जाधव उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून ह.भ.प. प्रियंकाताई अडसूळ



उपस्थित होत्या. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. सतिश माऊलगे, कमवि उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, तानाजी अडसूळ उपस्थित होते. कार्यक्रमात सर्वप्रथम संस्थेच्या संस्थापिका कै. सौ. केशरबाई क्षीरसागर उर्फ काकूंच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाला अर्पण अतिथिंच्या हस्ते संपन्न झाले.

त्यानंतर विद्यार्थ्यांमधून रोहीत नागरगोजे, वैभव सस्ते, आरिबा सय्यद, अंकिता भवर, जागृती गायकवाड, सुवर्णा क्षीरसागर या विद्यार्थ्यांनी मनोगतातून भावना व्यक्त केल्या. पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, डॉ. सतिश माऊलगे ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुण्यातील तो 'मृत्यू' जीबीएस' चा नाही; मृत्यू संशोधन समितीचा अहवाल

**पुणे । प्रतिनिधी**

नवी पेठेतील एका खासगी रुग्णालयामध्ये उपचार घेत असलेल्या ६० वर्षीय रुग्णाचा ३१ जानेवारीला मृत्यू झाला. त्याला 'गुलियन बॅरी सिंड्रोम' (जीबीएस) असल्याची नोंद याच रुग्णालयाने केली असल्याने महापालिकेनेही त्याची नोंद 'जीबीएस'चा मृत्यू अशी केली. मात्र, 'जीबीएस' ने झालेल्या मृतांच्या उपचारांच्या कागदपत्रांची 'मृत्यू संशोधन समिती' (डेथ ऑडिट कमिटी) च्या तज्ज्ञांकडून पडताळणी केली तेव्हा त्याला 'जीबीएस' नसल्याचे आढळून आले. तर त्याचा मृत्यू इतर गुंतागुंतीमुळे झाल्याचे निदान या समितीने केले असून आता त्याची नोंद कशी बदलायची, असा प्रश्न महापालिकेच्या आरोग्य विभागाला पडला आहे.

हा रुग्ण धायरीतील डीएसके विश्व जवळील एका सोसायटीजवळ राहत होता. त्याला २३ तारखेला जुलाबाचा त्रास झाला. २५ जानेवारीला त्याला दोन्ही पायांमध्ये अशक्तपणा जाणवत होता. त्याला आधी जवळील खासगी रुग्णालयात दाखल केले व नंतर नवी पेठेतील खासगी रुग्णालयात २७ जानेवारीला उपचारासाठी दाखल केले होते. त्यावेळी त्याला बेशुध्दावस्था आणि अर्धांगवायु ही शारीरिक लक्षणे होती. त्याला व्हेंटिलेटरवर घेण्यात आले. तसेच 'आयव्हीआयजी' व इतर उपचारही दिले.



दरम्यान, उपचार सूरू असताना त्याचा ३१ जानेवारीला हृदयविकाराचा धक्का आल्याने मृत्यू झाला. दरम्यान, त्याला जीबीएस सदृश लक्षणे असल्याने रुग्णालयाने त्याला 'जीबीएस' असल्याचे निदान केले होते. तर त्याचा 'बिकरस्टाफ ब्रेनस्टेम इन्सेफेलायटिस' (मध्यवर्ती मज्जासंस्थेवर हल्ला करणारा दुर्मिळ विकार), जीबीएस दमा व मधुमेह यामुळे मृत्यू झाला असल्याचे कारण खासगी रुग्णालयाने दिले होते. त्यानंतर केंद्र व राज्य शासनाकडून 'जीबीएस' बाबत आलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार या मृत्यूंची पडताळणी करण्यासाठी वेगवेगळ्या विषयांच्या तज्ज्ञांची 'मृत्यू संशोधन समिती'ची स्थापना केली आहे. आतापर्यंत 'जीबीएस' ने पाच जणांचा मृत्यू झाला असून या सर्वांच्या कागदपत्रांची पडताळणी केली असता ३१ जानेवारीला खासगी रुग्णालयात झालेल्या मृताला 'जीबीएस' नसल्याचा निष्कर्ष समितीने काढला. 'जीबीएस' च्या निदानाबाबत संभ्रम 'जीबीएस' च्या रुग्णांचे निदान करण्यासाठी अशी कोणतीही एक ठराविक चाचणी नाही. त्याचे निदान हे रुग्णांच्या अर्धांगवायुच्या लक्षणांवरून तसेच 'मज्जातंतू वहन चाचणी' (एनसीव्ही) आणि मेंदू आणि पाठीच्या कण्याभोवती असणारे द्रवामध्ये प्रोटीन्स आहेत का हे पाहून ठरवले जाते. परंतू, बहुतांश वेळा केवळ लक्षणांवरूनच या रुग्णांचे निदान केले जात आहे. शासनाकडूनही त्याबाबत स्पष्ट मार्गदर्शक तत्वे आलेली नाहीत. त्यामुळे, चुकीचे निदान होण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे.

## जीबीएस' रोगाच्या पार्श्वभूमीवर तळेगाव नगरपरिषदेकडून विविध उपाययोजना

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील काही भागात जीबीएस (गुलियन बॅरी सिंड्रोम) या रोगाचा प्रादुर्भाव होत आहे. दूषित पाण्यामुळे या रोगाची लागण होत असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याबाबत सर्व नागरिकांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन तळेगाव दाभाडे नगरपरिषदेमार्फत करण्यात आले आहे.

जीबीएसच्या पार्श्वभूमीवर तळेगाव नगरपरिषदेमार्फत विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. यात दूषित पाण्याद्वारे आजाराची बाधा होण्याची शक्यता गृहीत धरुन दूषित पाण्याचा शिरकाव पिण्याच्या पाण्यात होणार नाही याची दक्षता घेतली जात आहे. पाण्याचे नमुने दर महिन्याला तपासणीकरिता प्रयोगशाळेत पाठविण्यात येत आहेत. जीबीएसचा संभाव्य धोका लक्षात घेता पुढील काही दिवस दर १५ दिवसाला पाण्याचे नमुने सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेत पाठविणेत येणार आहे.

नगरपरिषदेमार्फत केलेल्या उपाययोजना :

१. दूषित पाण्याद्वारे आजाराची बाधा होण्याची शक्यता गृहित धरुन दूषित पाण्याचा शिरकाव पिण्याच्या पाण्यात होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.

२. पाण्याचे नमुने दर महिन्याला तपासणीकरिता सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेत तपासणीकरिता पाठविण्यात येतात.

३. जीबीएस चा संभाव्य धोका लक्षात घेता पुढील काही दिवस दर १५ दिवसाला पाण्याचे नमुने तपासणीसाठी सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेत पाठविणेत येतील तसेच शहरातील विविध भागातील पाणी नमुने तपासणीची दक्षता घेण्यात येईल.

## वीरकर हायस्कूलमध्ये माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

**सहकारनगर । प्रतिनिधी**

आदर्श शिक्षण मंडळीच्या सौ. सुशिलाबाई वीरकर हायस्कूल या शाळेतील २००० यावर्षीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात झाला. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी सर्व आजी व माजी मुख्याध्यापक, शिक्षक तसेच सेवक वर्गासह शाळेच्या बाहेर खाऊ विकणाऱ्या मावशींलाही आमंत्रित करून त्यांचा योग्य सन्मान केला. माजी विद्यार्थी शाळेबद्दल माहिती असलेला विशेष टी-शर्ट परिधान केला होता.




शालेय जीवन सोडून पंचवीस वर्षे झाल्यानंतरही आपण शाळेचे देणे लागतो, यानुसार प्राथमिक शाळेसाठी शालेय साहित्य तसेच माध्यमिक हायस्कूलसाठी मोठा स्क्रीन प्रोजेक्टर भेट दिला. विशेष म्हणजे या शाळेच्या आतील व बाहेरील परिसरात रंगकाम करीत लहान विद्यार्थ्यांना आकर्षित करीतल अशा शैक्षणिक गोष्टी आर्टिस्टकडून रेखांकित करून घेतल्या. या सर्व कामासाठी सर्व माजी विद्यार्थिनी, विद्यार्थ्यांनी स्वतः पैसे जमा केले होते. सूत्रसंचालन संदीप नागरे व केयुर कुलकर्णी यांनी केले.

## दहिवली, अंजरून येथील युवकांचा भाजपात प्रवेश

**खालापूर । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी खालापूर पुर्व मंडळ अध्यक्ष सनी यादव यांच्या पुढाकारातून तालुक्यातील अनेक युवकांनी भाजपात जाहीररित्या पक्षप्रवेश केला. खारघर येथील कार्यक्रमात मंत्री गणेश नाईक, माजी खासदार रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या उपस्थित हे पक्षप्रवेश झाले.



ग्रामपंचायत देवन्हावे हद्दीतील दहिवली आणि अंजरून गाव येथील अनेक युवकांनी हाती कमळ घेत आमदार ठाकूर आणि सनी यादव यांच्या नेतृत्वात काम करण्याचे ठरविले. यामुळे तालुक्यात भाजपाची ताकद वाढली आहे. केंद्रात नरेंद्र मोदी सरकार आणि राज्यात देवेंद्र फडणवीस सरकार असल्याने अनेक कार्यकर्ते भाजपात पक्ष प्रवेश करण्यासाठी उत्सूक असून लवकरच आणखीन पक्षप्रवेश होतील असे सनी यादव यांनी सांगितले.

## आचाऱ्यांच्या भांडणात एकाचा खून; आरोपीला पोलिसांकडून अटक

**चाकण । प्रतिनिधी**

चाकण - खराबवाडी (ता. खेड) येथील सारा सिटी रस्त्यावरील 'ऐश्वर्या हॉटेल' मध्ये शुक्रवारी (ता. ७) दोन आचाऱ्यांमध्ये झालेल्या किरकोळ वादातून एकाने दुसऱ्याच्या गळ्यावर चाकूने सपासप वार केले. यात विजय विनायक पांचाळे (वय ३८, मूळ रा. अमरावती) याचा मृत्यू झाला. याप्रकरणी आरोपी उदयप्रकाश महेंद्र गिरी (वय ३५, सध्या रा. खराबवाडी; मूळ रा. जमगई पोस्ट-मोडीलाडी सोनभद्री, उत्तर प्रदेश) या आरोपीला गुन्हे शाखा युनिट ३ चे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र कदम व त्यांच्या पथकाने अटक केली.



आरोपी गिरी व पांचाळे हे दोघे 'ऐश्वर्या हॉटेल' येथे आचारी म्हणून काम करत होते. तसेच, दोघेही हॉटेलमधील टेरेसच्या रूममध्ये एकत्र राहत होते. त्यांच्यात किरकोळ वाद झाले. त्यानंतर आरोपी गिरी याने हॉटेलमधील चाकूने पांचाळे याच्या गळ्यावर सपासप वार केले. त्यात पांचाळे याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. याची माहिती पोलिसांना तत्काळ देण्यात आली.

पोलिस घटनास्थळी आल्यानंतर आरोपी गिरी हा पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना त्याला पोलिसांच्या पथकाने अटक केली. या आरोपीला पोलिस अंमलदार योगेश आढारी, राजकुमार हनुमंते, सचिन मोरे, ऋषिकेश भोसुरे, सागर जैनक, त्रिनयन बाळसराफ, संदीप सोनवणे, प्रदीप राळे, विठ्ठल सानप, योगेश कोळेकर, सुधीर दांगट, समीर काळे, शशिकांत नांगरे, राहुल सूर्यवंशी, मनोज साबळे यांच्या पथकाने ताब्यात घेतले. आरोपी गिरी हा काही दिवसांपूर्वी गावी गेला होता. तो गावावरून पुन्हा हॉटेलमध्ये आला होता. पांचाळे हा हॉटेलमध्ये वेटरचे काम करत होता. तो नंतर आचारी झाला होता. त्यामुळे यापूर्वीचा आचारी असलेला गिरी व पांचाळे यांच्यात काही वाद झाले. त्यानंतर हा खून झाला, असे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र कदम यांनी सांगितले.

## पुणे ग्रामीण जिल्ह्यात २१ फेब्रुवारीपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे ग्रामीण जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्याच्यादृष्टीने अपर जिल्हादंडाधिकारी ज्योती कदम यांनी २१ फेब्रुवारी २०२५ च्या रात्री १२ वाजेपर्यंत महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

या आदेशानुसार कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ द्रव्य बरोबर नेणे, दगड अथवा शस्त्रे किंवा अस्त्रे सोडावयाची अस्त्रे किंवा फेकावयाची हत्यारे अगर साधने बरोबर नेणे, शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, दंड, काठ्या, बंदुका व शारीरिक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणत्याही इसमाच्या चित्राचे प्रतिकात्मक प्रेताचे किंवा पुढाऱ्यांच्या चित्राचे, प्रतिमेचे प्रदर्शन व दहन करणे, मोठ्याने अर्वाच्च्य घोषणा देणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध करण्यात आला आहे. सभ्यता अगर नितिमत्ता यास धोका पोहचेल किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा राज्य उलथवून देण्यास प्रवृत्त करेल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे, अविर्भाव करणे, कोणतेही जिन्नस तयार करुन त्याचा जनतेत प्रसार करणे, कायदा व सुव्यवस्था धोक्यात येईल अशा पद्धतीने महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) विरुद्ध वर्तन करणे, कलम ३७ चे पोटकलम (३) अन्वये पाचपेक्षा जास्त लोकांचा जमाव करणे तसेच पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक यांच्या पूर्वपरवानगी शिवाय सभा घेणे किंवा मिरवणूक काढणे यासदेखील प्रतिबंध करण्यात आला आहे.



हा आदेश शासनाच्या सेवेतील व्यक्तींना व ज्यांना आपल्या वरीष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्यपूर्तीसाठी हत्यार बाळगणे आवश्यक आहे व त्याबाबत परवानगी आहे, त्यांना लागू होणार नाही. आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधित व्यक्ती महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम १३५ प्रमाणे शिक्षेस पात्र राहील, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## विद्यार्थी खेळाडूंचे प्रस्ताव राज्य बोर्डाने मागवले

**पुणे । प्रतिनिधी**

राज्य बोर्डाच्या यंदाच्या दहावी व बारावीच्या परीक्षेतील खेळाडू विद्यार्थ्यांचे प्रस्ताव संबंधित क्रीडा अधिकाऱ्यांकडून १५ एप्रिलपर्यंत मागविण्यात येणार आहेत. तसेच एन.सी.सी, स्काऊट गाइडचे प्रस्ताव देखील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी विभागीय मंडळांकडे १५ एप्रिलपर्यंत पाठवावेत, अशी सूचना राज्य मंडळाकडून करण्यात आली आहे.




दहावी व बारावीच्या परीक्षेत प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थी आणि एन.सी.सी, स्काऊट गाइडच्या विद्यार्थ्यांना सवलतीचे गुण दिले जातात. या गुणांसाठी राज्य मंडळाकडून संबंधित क्रीडा अधिकारी व शिक्षणाधिकारी यांच्याकडून ऑनलाइन पद्धतीने प्रस्ताव मागविण्यात येतात. दहावी व बारावीच्या परीक्षा यंदापासून परीक्षा लवकर होणार असल्याने सवलतीच्या गुणांसाठीचे प्रस्ताव दि. १५ एप्रिलपर्यंत ऑनलाईन पद्धतीने पाठविण्यात यावेत, असे मंडळाकडून कळविण्यात आले आहे.

## सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकाच्या मुलाचे टोकाचे पाऊल

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील एका सहाय्यक उपनिरीक्षकाच्या १९ वर्षीय मुलाने नैराश्यातून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. पुण्यातील पोलीस वसाहतीत राहत्या घरी गळफास लावून त्याने आत्महत्या केली आहे. ऋषिकेश कोकणे अस १९ वर्षीय आत्महत्या केलेल्या मुलाचे नाव आहे. पोलिसांना एक वीडियो सापडला आहे. त्यावरून प्रेमभंग आणि नैराश्यातून आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

पुढे आलेल्या माहितीनुसार, आई वडील घरात नसताना त्याने ही आत्महत्या केली आहे. तर ऋषिकेश बीएच्या दुसऱ्या वर्षाला शिकत होता. या घटनेची नोंद शिवाजीनगर पोलीस स्टेशनमध्ये नोंदविण्यात आली असून या घटनेचा अधिक तपास पोलीस करत आहेत. मात्र या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

## पुण्याच्या भुकूम येथील सोसायटीत आढळली पाकिस्तानी चलनातील नोट

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील मुळशी तालुक्यातील भुकूम येथील स्काय आय मानस लेक सिटी मधील आयरिस- ३ या सोसायटीच्या लिफ्टबाहेर पाकिस्तानी चलनामधील नोट आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. ज्या सोसायटीमध्ये ही नोट आढळली आहे ती सोसायटी नॅशनल डिफेन्स अकॅडमीच्या हद्दीपासून अगदी काही मीटर अंतरावर आहे. याबाबत सोसायटी चे चेअरमन सहदेव यादव यांनी बावधन पोलीस स्टेशनमध्ये अर्ज दिला असून याबाबत सखोल चौकशी करण्याची मागणी सोसायटीच्या वतीने तसेच ग्रामस्थांच्या वतीने पोलिसांना केली आहे.



### सखोल चौकशी करण्याची स्थानिकांची मागणी

मिळालेल्या माहितीनुसार, सोसायटीच्या लिफ्टच्या बाहेर ही नोट पडलेली असल्याचे सोसायटीचे चेअरमन सहदेव यादव यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी तातडीने लगेच बावधन येथील पोलिसांना संपर्क करून त्या ठिकाणी जाऊन अर्ज दिला आहे. पाकिस्तानी चलनातील सापडलेली नोट ही वापरातील असून ती अनेक वेळा वापरली असल्याचे तिच्या एकूण स्थितीवरून दिसते. ही नोट या सोसायटीच्या लिफ्टच्या बाहेर कोणाच्या खिशातून पडली की आपल्या देशामध्ये कोणाकडून आली, याचा तपास होण्याची गरज आहे. परिणामी याबाबत सखोल चौकशी करण्याची मागणी ही आता स्थानिकांनी केली आहे. मात्र हा नेमका प्रकार काय हे तपासाअंती कळू शकणार आहे.